cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२९ | शुक्रवार दि.१० मे २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

संपादकीय

सीबीआय सरकारची बटिक झालीय का?

सीबीआयवर भारत सरकारचे नियंत्रण नसल्याचे केंद्र सरकारने २ मे रोजी सर्वोच्च न्यायालयात स्पष्ट केले. राज्यातील अनेक प्रकरणांचा तपास सीबीआयकडे सोपविण्याला आक्षेप घेणारी याचिका पश्चिम बंगाल सरकारने दाखल केली आहे. त्यावर केंद्र सरकारने याबाबतची आपली भूमिका स्पष्ट केली आहे. राज्यघटनेच्या कलम १३१ अंतर्गत प. बंगाल सरकारने केंद्राविरुद्ध सुप्रीम कोर्टात खटला दाखल केला आहे. न्या. बी. आर. गवई आणि न्या. संदीप मेहता यांच्या खंडपीठासमोर यावर सुनावणी झाली.

डॉ. नरेंद्र दाभोलकर हत्या खटल्याचा आज निकाल

पुणेः महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या हत्याप्रकरणाचा निकाल शुक्रवारी (दि. १०) जाहीर करण्यात येणार आहे. या खटल्यात पाच आरोपींवर आरोप निश्चिती करण्यात आले असून, हत्येनंतर १० वर्षांनी हे प्रकरण निकाली लागत आहे. डॉ. दाभोलकर यांची पुण्यातील ओंकारेश्वर मंदिराजवळील महर्षी शिंदे पुलावर २० ऑगस्ट २०१३ ला सकाळी पिस्तुलातून गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. ओंकारेश्वर मंदिराजवळील शिंदे पुलावर सकाळी सव्वासातच्या सुमारास दुचाकीवरून आलेल्या दोघांनी त्यांना थांबवले व अगदी जवळून पिस्तुलाच्या गोळ्या त्यांच्यावर झाडल्या होत्या. त्यात त्यांचा जागेवर मृत्यू झाला होता.

शेतकऱ्यांचा ८५७ कोटी रुपयांचा एफआरपी थकला

राज्यातील साखर कारखानदारांच्या बतावण्या सुरू, म्हणे हंगाम संपेपर्यंत देऊ

पुणे । प्रतिनिधी

यदाच्या गाळप हंगामात २०७ कारखान्यांनी ३२ हजार ३४० कोटी रुपयांची एफआरपी रक्कम शेतकऱ्यांना दिली आहे. यंदा साखर कारखान्यांनी १०२७.१७ लाख टनाचे उसाचे गाळप केले, त्याची एकूण रक्कम ३३ हजार १९८ कोटी रुपये इतकी झाली. त्यापैकी ३२ हजार ३४० कोटी रुपयांचा एफआरपी जमा केला. पण अजूनही ८५७ कोटी रुपयांचा एफआरपी कारखान्यांनी थकवला आहे. अजून गाळप हंगाम अधिकृतपणे संपल्याचे

राज्य सरकारने जाहीर केलेले नाही. त्यामुळे थकलेला एफआरपी हंगाम संपेपर्यंत जमा केला जाईल, असे कारखानदारांकडून सांगितल जात आहे.

लोकसभा निवडणुकांच्या दरम्यान साखरेच्या दरात वाढ होऊ नये, यासाठी केंद्र सरकारने साखर निर्यातीवर बंधने घातलेली आहेत. तर इथेनॉल निर्मितीवरही निर्बंध लावलेली आहेत. परिणामी शेतकऱ्यांना एफआरपी देताना कारखानदारांना अडचणी येत असल्याचे बोलले जात आहे. आणि त्याचा फटका ऊस उत्पादक शेतकऱ्यांना बसतो आहे.

यंदा गाळप हंगामाच्या सुरुवातीला साखर उत्पादन घटीची शक्यता वर्तवली जात होती. कारण खरीप हंगामात पावसाचे खंड पडले होते. त्याचा उत्पादनावर परिणाम होईल, अशी शक्यता होती. परंतु २०२३ च्या नोव्हेंबर-डिसेंबर महिन्यात पडलेल्या अवकाळीमुळे ऊस उत्पादकांना काहीसा दिलासा मिळाला होता. त्यामुळे उत्पादनाचे अंदाज सपशेल चुकले. त्यात लोकसभा निवडणुकांच्या दरम्यान साखरेचे दर वाढू नयेत, यासाठी केंद्र सरकारने कसलीही कसर सोडली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना मात्र झळ बसली आहे.

कारखानदारांकडून टाळाटाळ

साखर कारखान्यांनी ऊस गेल्यानंतर १४ दिवसांच्या आत शेतकऱ्यांच्या खात्यावर एफआरपी रक्कम जमा करणे साखर कारखान्यांसाठी बंधनकारक आहे. त्याबद्दल कारखान्यांना वारंवार साखर आयुक्तांकडून सूचना केल्या जातात. अलीकडेच एफआरपी थकवणाऱ्या कारखान्यांवर जप्तीची कारवाई करण्याचा इशाराही साखर आयुक्तांनी दिलेला आहे. पण तरीही कारखान्यांकडून एफआरपी वेळेवर दिला जात नाही.

केंद्राच्या धोरणाचा फटका

दरम्यान, केंद्र सरकारने साखर निर्यातीवर बंधने घातल्यामुळे कारखान्यांना साखर निर्यात करता येत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना एफआरपी द्यायचा कसा, असा प्रश्नही कारखानदार उपस्थित करत आहेत. परिणामी केंद्र सरकारच्या धोरणांचा शेतकऱ्यांना फटका सोसावा लागतो आहे.

पंकजाताईंसाठी नितीन गडकरी आज माजलगावात

माजलगाव । प्रतिनिधी

भाजपा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ केंद्रीय मंत्री विकासपुरुष नितीन गडकरी यांची माजलगाव येथे उद्या शुक्रवारी दुपारी जाहीर सभा होणार आहे. या जाहीर सभेला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन भाजपा महायुती प्रचार समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

भाजप महायुतीच्या बीड लोकसभा मतदारसंघाच्या लोकप्रिय उमेदवार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांची सुरुवातीपासूनच प्रचारात प्रचंड आघाडी घेतलेली असुन देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचीही पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारासाठी अंबाजोगाई येथे सभा झाली. त्यानंतर आता माजलगाव येथे विकासपुरुष केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे खास पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारासाठी येत आहेत. शुक्रवार, दि. १० मे २०२४ रोजी दुपारी १२:०० वा. जुना मोंढा, येथे ही सभा होणार आहे. ''सबका साथ सबका विकास'' सूत्र डोळ्यासमोर ठेऊन, गरीब कल्याणाचा रथ मोदी ◀◀ पान २ वर

लोकसभेला बजरंग बप्पा निवडून येतील, विधानसभेलाही आपलं सरकार- पाटील

शिरूर। प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या प्रचार दौऱ्यानिमित्त बीड जिल्ह्यामध्ये फिरत असताना बीड जिल्ह्यातील मतदार बजरंग बप्पाच्या पाठीशी आहे. लोक स्वतःहून कामाला लागले आहेत. यामुळे बजरंग बप्पा सोनवणे यांचा विजय निश्चित होणार आहे. बीड लोकसभा निवडणुकीमध्ये बजरंग बप्पा निवडून येतील आणि विधानसभा निवडणुकीत सरकारही आपलंच असेल असा आत्मविश्वास राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार)चे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी शिरूर कासार येथे सभेत व्यक्त केला.

शिरूर कासार शहरांमध्ये गुरुवार दि.९ मे रोजी इंडिया आघाडी तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी(शरदचंद्र पवार)चे उमेदवार ◀◀ पान २ वर

बीड जिल्ह्याच्या विकासासाठी बजरंग सोनवणे यांना निवडून द्या

शरद पवार : मराठा आरक्षणासह मुंडे बहिण-भावाच्या विरोधात बोलणे टाळले

आंबाजोगाई । प्रतिनिधी

देशाचे पंतप्रधान अंबाजोगाईत येऊन गेले गेल्या दहा वर्षात काय केलं आणि पुढे काय करणार हे त्यांनी सांगणं आवश्यक होतं मात्र सध्या त्यांचा एक कलमी कार्यक्रम सुरू आहे. हे त्यांना शोभत नाही, असे सांगून देशाचे माजी कृषिमंत्री शरद पवार म्हणाले की, साखर कारखाना चालवताना सर्वाधिक गाळप आणि सर्वाधिक दर बजरंग सोनवणे यांनी दिला आहे. बीड जिल्हा हा मागासलेला असल्यामुळे जिल्ह्याच्या विकासासाठी बजरंग सोनवणे यांना निवडून द्या असे आवाहन अंबाजोगाई येथील जाहिर सभेत त्यांनी केले. तसेच शरद पवार यांनी भाजपचे उमेदवार पंकजाताई मुंडे आणि धनंजय मुंडे यांच्या विरोधात बोलणे ही टाळले. त्यामुळे उलट सुलट चर्चांना उधाण आले आहे.

महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्या प्रचारार्थ आंबाजोगाईत शरद पवार यांची ◀◀ पान २ वर

जयंत पाटील

राज्यात जातीजातीत भांडणे लावली. याचं फळ सध्या भाजप भोगत आहे. देशाच्या पंतप्रधानांनी पुढे मी काय करणार आहे, हे सांगणे अपेक्षित होते. मात्र ते आंबाजोगाईत वेगळच बोलले. महागाईला सामान्य माणूस तोंड देत आहे, बेरोजगारी कायम आहे. खताच्या किमती वाढल्या, आता तुम्ही कमळावर बटन दाबले तर पेट्रोल, डिझेल, जीएसटी पुन्हा वाढवतील, हे लक्षात ठेवा, असे पाटील म्हणाले. राज्यातही सर्व वस्तूंच्या किमती यांनी वाढवल्या. गेल्या वर्षभरात यांनी फक्त दोन पक्ष फोडण्यापलीकडे यांनी काहीच केले नाही, असा आरोप पाटील यांनी केला. गेल्या निवडणुकीत बजरंग सोनवणे हे कसे चांगले आहेत, हे सांगितले आहे. त्यामुळे आता ते वाईट आहेत. हे सांगण्याची आता गरज नाही. गेल्या १० वर्षात बीड जिल्ह्याचा विकास का झाला नाही? असा प्रश्न यावेळी पाटील यांनी उपस्थित केला.

अनिल देशमुख

राज्यात फक्त फोडाफोडीचे राजकारण झाले. एकाएकाला ५०-५० कोटी दिले. त्यानंतर राष्ट्रवादीही अशीच फोडली. हे सर्व महाराष्ट्रातील जनता पाहत होती. या भागातील शेतकरी अडचणीत आहेत. कापूस, सोयाबीनला भाव नाही, ठाकरे सरकारच्या काळात चांगला भाव होता. परदेशातून कापसाच्या गाठी आयात केला, त्यामुळे भाव पडले. सोयाबीनचेही असेच असून निर्यात होत नसल्याने भाव वाढत नाही. खताच्या किमती २० टक्क्यांनी वाढवल्या आहेत. त्यामुळे शेतकरी अडचणीत आला आहे. बजरंग सोनवणे यांना निवडून देण्याचे आवाहन देशमुख यांनी केले.

रजनी पाटील

बीड जिल्हा शरद पवारांवर नितांत प्रेम करतो. १९८० मध्ये असेच सर्व आमदार पवार साहेबांना सोडून गेले होते. त्यानंतर निवडणुकीत पवारांच्या पक्षाचे सर्वच्या सर्व ६ आमदार निवडून आले. त्यामुळे त्यांच्यावर येथील जनता खूप प्रेम करते. शेतकऱ्यांन न्याय मिळायला हवा. क्रांतीसिंह नाना पाटील यांनाही लोकांनी निवडूण दिले. ते कर्जमाफीबाबत नेहमी फिटलं असे म्हणत होते. त्यामुळे काँग्रेस सत्तेत आल्यावर आम्ही कर्जमाफी करण्यासाठी कटिबद्ध आहोत, असे खा. रजनीताई पाटील यांनी सांगितले. बजरंग बप्पा हे सर्व सामान्याचे नेते आहेत. पवारांची गॅरंटी सर्वांना माहित आहे, त्यामुळे त्यांच्या गॅरंटीवर बजरंग सोनवणेंना निवडूण द्या, असे आवाहन त्यांनी केले.

परळीतही सीसीटिव्ही लावा

प्रशासनाने केज, गेवराई आणि बीड विधानसभा मतदार संघात सर्वात जास्त सीसीटिव्ही लावले आहेत. परळीतही सर्वत्र सीसीटिव्ही लावा, असे मी जाहीर आवाहन निवडणुक विभागाला करतो, असे सोनवणे म्हणाले.

राजेश टोपे

स्वामी रामानंद यांनी आंबाजोगाई येथूनच मराठवाडा मुक्तीसंग्राम सुरू केला. त्यामुळे येथूनच मोदी-भाजप मुक्तीची चळवळ सुरु करायची आहे. जिल्हा परिषदेचा अनुभव आहे, तसेच सामान्यांसाठी नेहमीच काम करणारे बजरंग सोनवणे यांना निवडूण देण्याची काळाची गरज आहे. शेतमालाला भाव मिळत नाही, विमा मिळत नाही, अनुदान मिळत नाही. मात्र काही लोकांना कोट्यावधींचे कर्ज बुडवू दिले जाते, असे माजी आरोग्य मंत्री राजेश टोपे यांनी सांगितले.

पुण्यात मुसळधार, मराठवाड्यात अवकाळी पावसाच्या सरी

पुणे । प्रतिनिधी

राज्यातील कोकण वगळता इतर विभागातील बहुतांश जिल्ह्यात अवकाळी पावसाचे आगमन झाल्याने वातावरणात गारवा निर्माण झाला आहे. भारतीय हवामान विभागाने जारी केलेल्या अंदाजानुसार, ९ मे रोजी पुणे, संभाजीनगर, हिंगोली, वाशिम, यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह पावसाने हजेरी लावली. यावेळी सोसाट्याचा वाराही वाहताना पाहायला मिळाला.

हवामान खात्याचा अंदाज खरा ठरला असून, अनेक भागांत पावसाचे आगमन झाले आहे.

पुण्यातील सिंहगड रोडवरही जोरदार धारा कोसळल्याचे पाहायला मिळाले. नांदेड सिटी, धायरी, बावधन, कात्रजघाट हायवे मार्गावर मुसळधार पाऊस झाला. तर, आंबेगात ते सिंहगड रोडवरही पावसाने हजेरी लावली. यवतमाळ जिल्ह्यात दुपारच्या सुमारास जिल्ह्यातील आर्णी, ◀◀ पान २ वर

समता परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी पंकजाताई मुंडेंच्या पाठिशी उभे राहावे: ॲड.सुभाष राऊत

बीड । प्रतिनिधी

बीड लोकसभा मतदार संघातील निवडणूक आता निर्णायक वळणावर उभी आहे. या निवडणुकीत ओबीसींच्या हितासाठी पंकजाताई मुंडे निवडून आल्या पाहिजेत अशी भूमिका समता परिषदेचे संस्थापक आध्यक्ष मा. छगनराव भुजबळ साहेब यांनी घेतलेली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील ओबीसी बांधवांनी या निवडणुकीत खंबीरपणे महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या पाठिशी उभे राहावे असे आवाहन समता परिषदेचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड. सुभाष राऊत यांनी केले आहे.

बीड लोकसभा निवडणूकीचा प्रचार अंतीम टप्प्यात पोहचला आहे. या निवडणुकीत ओबीसींच्या हितासाठी पंकजाताई मुंडे यांना निवडुण आणण्याचे आदेश मा.छगनराव भुजबळ साहेब यांनी दिले आहेत. त्यामुळे समता परिषद या निवडणुकीत सक्रियपणे काम करीत आहे. गावागावातील समता सैनिक आणि तमाम ओबीसींनी आज पंकजाताई मुंडे यांच्या पाठिशी उभे राहण्याची आवश्यकता आहे. त्यासाठीच प्रत्येकाने आपल्या गावात जास्तीत जास्त मतदान कसे होईल आणि त्यातून महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांना मताधिक्य कसे देता येईल हे पहावे, असे ॲड.सुभाष राऊत यांनी प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे. स्वतः ॲड.सुभाष राऊत यांनी समता परिषदेच्या माध्यमातून पंकजाताई मुंडे यांच्या प्रचार अभियानाला गती दिली आहे.

बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.९ मे २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

	किमान	कमाल	सरासरी
गहू : ४४.०० क्विंटल			
	२,२५०	२,६७०	२,३६३
ज्वारी/हायब्रिड : १६५.५० क्विंटल			
	१,७००	३,५८०	२,४८८
मूग : ०.५० क्विंटल			
	९,८५०	९,८५०	९,८५०
तूर : ८०.०० क्विंटल			
	४,५००	१०,९६३	९,६०७
उडीद : ५.५० क्विंटल			
	७,९००	७,९०१	७,९००
बाजरी: ७९.५० क्विंटल			
	२,०८५	२,८०१	२,४७७
चिंच/लोकल: १०.०० क्विंटल			
	६,५००	६,५००	६,५००
सोयाबीन: २१६.०० क्विंटल			
	४,५७५	४,६०१	४,५८५
हरभरा: ५.०० क्विंटल			
	५,६००	६,१००	५,७८७

मराठा समाजाचे अगोदरच ठरले आता ओबीसींनीही ठरवले!

मतदारांचा कल: मुस्लिम आणि मागासवर्गीय समाजाच्या भुमिकेकडे सर्वांचे लक्ष

बीड । प्रतिनिधी

देशाचे पंतप्रधान एखाद्या जिल्ह्यात आले तर निश्चितच त्या भागातील राजकीय वातावरण बदलत असते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सभेनंतर बीड लोकसभेतील मतदारांची भुमिका स्पष्ट झाली आहे. मराठा समाजाने काय करायचे ते अगोदरच ठरवले आहे तर मोदींच्या सभेनंतर ओबीसी, मारवाडी, ब्राम्हण समाजाने या निवडणुकीत काय भुमिका घ्यायची ते आता निश्चित केले असल्याचे म्हटले जात आहे. तर मुस्लिम आणि मागासवर्गीय समाज नेमकी काय भुमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. तळ्यात मळ्यात असणाऱ्या मतदारांना आता योग्य दिशा मिळाली असून पंकजाताई मुंडे यांना या सभेचा फायदा होताना दिसत आहे तर या सभेनंतर मराठा आणि मुस्लिम समाजाचा कल बजरंग सोनवणे यांच्या बाजूने जाण्याची शक्यता आहे.

अशोक हिंगे मराठा समाजाची किती मते घेणार?

वंचित आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे हे चळवळीतील व्यक्ती असल्याने मराठा समाजाची मते त्यांना किती पडतात? हे महत्वाचे ठरणार आहे. आपण आतापर्यंत समाजासाठी काम केले आहे. त्यामुळे या निवडणुकीत समाज मला वाऱ्यावर सोडणार नाही, मतांच्या रुपाने मला आशिर्वाद दिला जाणार असल्याचा दाव अशोक हिंगे यांनी केला आहे.

मोदींच्या सभेने कही गम खुशी कही गम!

मोदी यांची सभा झाल्याने ओबीसी आणि मागासवर्गीय समाज भाजपच्या बाजूने जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तर मराठा आणि मुस्लिम समाज मात्र बजरंग सोनवणे यांच्या बाजूने झुकल्याचे म्हटले जात आहे. त्यामुळे महायुतीसाठी मोदींची सभा कही खुशी कही गम अशीच ठरली.

केजच्या चंदनाचा सोनवणेंसाठी धक्का

चंदनचोर बालाजी जाधव यांच्याकडे पोलिसांनी सव्वा दोन कोटीचे चंदन पकडल्यावर त्याचा संबंध सोनवणे यांच्याशी जोडण्याचा प्रयत्न केला गेला. त्याचाही फटका सोनवणे यांना बसण्याची शक्यता आहे. सध्या सोशल मिडीयावर त्यांना मोठ्या प्रमाणावर ट्रोल केले जात आहे.

बीड लोकसभेची निवडणुक अगदी रंजक वळणावर पोहचली असून महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे, महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे आणि वंचित आघाडीचे ◀◀ पान २ वर

cmyk

अग्रलेख

सीबीआय सरकारची बटिक झालीय का?

सीबीआयवर भारत सरकारचे नियंत्रण नसल्याचे केंद्र सरकारने २ मे रोजी सर्वोच्च न्यायालयात स्पष्ट केले. राज्यातील अनेक प्रकरणांचा तपास सीबीआयकडे सोपविण्याला आक्षेप घेणारी याचिका पश्चिम बंगाल सरकारने दाखल केली आहे. त्यावर केंद्र सरकारने याबाबतची आपली भूमिका स्पष्ट केली आहे. राज्यघटनेच्या कलम १३१ अंतर्गत प. बंगाल सरकारने केंद्राविरुद्ध सुप्रीम कोर्टात खटला दाखल केला आहे. न्या. बी. आर. गवई आणि न्या. संदीप मेहता यांच्या खंडपीठासमोर यावर सुनावणी झाली. सीबीआयने राज्याच्या परवानगीशिवाय अनेक प्रकरणांचा तपास हाती घेतला आहे. सीबीआय एफआयआर नोंदवून तपास करत असल्याचा आरोप प. बंगाल सरकारतर्फे करण्यात आला आहे. राज्याने आपल्या अधिकार क्षेत्रात सीबीआयला विविध प्रकरणांची चौकशी करण्यासाठी दिलेली सर्वसाधारण संमती मागे घेतल्यानंतरही हे घडत असून असे करणे चुकीचे आणि संघराज्य रचनेच्या विरोधात आहे, असे प. बंगालमधील ममता बॅनर्जी सरकारचे म्हणणे आहे.

प. बंगाल सरकारने दाखल केलेल्या या दाव्यावर केंद्राने सीबीआय आमच्या 'नियंत्रणात' नसून स्वायत्त असल्याचे म्हटले आहे. केंद्र तसेच एक किंवा अधिक राज्यांमधील वादात सर्वोच्च न्यायालयाच्या मूळ अधिकारक्षेत्राशी निगडीत कलम १३१ आहे. घटनेचे कलम १३१ हे सर्वोच्च न्यायालयाला दिलेले 'सर्वांत पवित्र अधिकार क्षेत्रांपैकी एक' आहे आणि या तरतुदीचा गैरवापर होऊ दिला जाऊ शकत नाही, असे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी केंद्र सरकारच्या वतीने सांगितले. तसेच ज्या गुन्ह्यांचा सीबीआयने नोंद केल्याचा उल्लेख राज्य सरकारने केला आहे, ते केंद्र सरकारने नोंदविलेले नाहीत. भारत सरकारने कोणताही गुन्हा दाखल केलेला नाही, सीबीआयने ते दाखल केलेले आहेत असे तुषार मेहता म्हणाले. खरे तर, १६ नोव्हेंबर २०१८ रोजी प. बंगाल सरकारने सीबीआयला तपासाबाबत किंवा राज्यात छापे टाकण्याबाबत दिलेली संमती मागे घेतली होती. त्यानंतरही सीबीआय गुन्हे नोंदवत असल्याच्या विरोधात प. बंगाल सरकारने सुप्रीम कोर्टात धाव घेतली आहे. सीबीआयला कुठल्याही राज्यात तपास करण्यासाठी संबंधित राज्य सरकारच्या परवानगीची आवश्यकता असते, असे असतानाही अनेक राज्यांमध्ये केंद्र सरकारच्या आदेशावरून विरोधी पक्षाच्या नेत्यांना खोट्या प्रकरणामध्ये गोवले जात असल्याचे अनेकवेळा आढळून आले आहे.

सीबीआय, ईडी आणि आयटीच्या आडून विरोधी पक्षांच्या नेत्यांना तुरुंगात डांबणाऱ्या केंद्र सरकारने सुप्रीम कोर्टातही 'खोटे बोल पण रेटून बोल'चे धोरण अवलंबिलेले दिसते. राज्याशी संबंधित कोणत्याही प्रकरणात सीबीआय तपासासाठी राज्य सरकारच्या परवानगीची गरज असते. प. बंगाल सरकारने १६ नोव्हेंबर २०१८ रोजी सीबीआयकडून तपासाची परवानगी काढून घेतली होती. चिटफंड घोटाळाप्रकरणी केंद्र सरकार केंद्रीय तपास यंत्रणांचा गैरवापर करत असल्याचा आरोप प. बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी केला होता. सीबीआयला तपासाचे आदेश केंद्र सरकार देऊ शकते. हायकोर्ट किंवा सुप्रीम कोर्ट सीबीआयला तपासाचे आदेश देऊ शकते. राज्य सरकार सीबीआय तपासासाठी केंद्र सरकारला शिफारस करू शकते. जनतेच्या मागणीचा विचार करून केंद्र सरकार सीबीआयला तपासाचे आदेश देऊ शकते.

इतके सारे पर्याय स्पष्ट असताना मोदी सरकारने कानावर हात ठेवण्याचे कारण काय? पूर्वी देशात कुठेही एखादी खळबळजनक घटना घडली की विरोधकांची पहिली मागणी असायची ती त्या प्रकरणाची चौकशी सीबीआयकडे सोपविण्याची. एखाद्या प्रकरणावर गदारोळ सुरू झाला की तो थांबवण्यासाठी सरकार सीबीआयकडे चौकशीचे आदेश देऊन मोकळे व्हायचे. काहीवेळा या यंत्रणेवर टीकाही व्हायची पण बहुतांशी तो राजकीय विरोधाचा भाग असायचा. मात्र, आज परिस्थिती बदलली आहे. गत काही वर्षांत केंद्रातील राज्यकर्ते वगळता साऱ्यांचा सीबीआयवरील विश्वास उडाला आहे. सीबीआय ही केंद्र सरकारची बटिक बनल्याची धारणा निर्माण झाली आहे, असा आरोप काँग्रेस सरकार सत्तेवर होते तेव्हाही होत होता परंतु आता भाजप सरकारच्या काळात सीबीआयची पानटपरी झाली आहे, असे आरोप सर्रास होत आहेत. सीबीआयवर नियंत्रण कोणाचे हा कळीचा मुद्दा आज उपस्थित झाला आहे. सीबीआय, ईडी, आयटी अशा सरकारी विभागाचा, यंत्रणांचा निव्वळ राजकीय हेतूंसाठी कोण वापर करीत आहे ते आता लपून राहिलेले नाही.

राजे धर्माजी गडाच्या सप्ताहाची ह.भ.प.रोहिदास महाराज शास्त्री यांच्या किर्तनाने सांगता

पिंपळवंडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील हातोला (खलाटवाडी) येथील श्री.क्षेत्र राजे धर्माजी गडाच्या पंचकुंडी महायज्ञ,मूर्ती प्राणप्रतिष्ठा तसेच अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्याची सांगता दि.६ मे २०२४ सोमवार रोजी संस्थांनचे ह.भ.प.रोहिदास महाराज शास्त्री (भागवत भास्कर) यांच्या सुश्राव्य किर्तनाने व महाप्रसादाने मोठ्या भक्तीमय व उत्साही वातावरणात झाली. याप्रसंगी माजी आमदार भिमराव धोंडे, साहेबराव दरेकर तसेच विजय गोल्हार,यश आजबे,एन.टी.गर्जे,सरपंच सर्वश्री बाबासाहेब गर्जे,अशोक गर्जे, अभय गर्जे,अशोक जेधे,आश्रुबा खलाटे,महेश खेंगरे,नवनाथ सानप, नवनाथ सांगळे,धनंजय बडे,भागवत ढाकणे,बाळासाहेब गर्जे,डॉ.नवनाथ गर्जे,राजेंद्र इथापे तसेच शिवाजी नाकाडे,बडे मामा शेवगाव,भास्कर गर्जे,काकासाहेब गर्जे,निवृत्ती गर्जे,बाळू ढाकणे आदीसह पंचक्रोशीतील भाविक-भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

३ उमेदवारांना निवडणूक खर्चाची नोंदवही तपासणीसाठी गैरहजर असल्याबाबत नोटीस

बीड। प्रतिनिधी

करुणा धनंजय मुंडे, ताटे महेंद्र अशोक, सलीम अल्लाबक्ष सय्यद या तीन उमेदवारांना निवडणूक खर्चाची नोंदवही तपासणीसाठी सादर करण्यात कसूर केल्याबद्दल जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी नोटीस जारी केले आहे.

निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांच्या लेखांची तपासणी निवडणुकी काळात तीनदा केली जाते. त्याप्रमाणे उमेदवाराच्या लेखांची दुसरी तपासणी ८ मे जिल्हा नियोजन समिती सभागृह येथे सकाळी १०.०० ते सायंकाळी ०५.०० या कालावधीत उमेदवारांनी स्वतः अथवा प्राधिकृत प्रतिनिधीच्या माध्यमातून सादर करणे बंधनकारक होते. मात्र करुणा धनंजय मुंडे या उमेदवाराकडून सदर दिवशी प्राधिकृत प्रतिनिधी यांनी सादर केलेले निवडणूक खर्चाचे अभिलेख अपूर्ण होते. तसेच खर्च नोंदवही अभिलेखाची तपासणी करून न घेताच प्रतिनिधी तपासणी स्थळावरून निघून गेले. नंतर तपासणी पथकाकडून श्रीमती मुंडे यांचे प्रतिनिधी अजयकुमार विष्णू देडे यांना अनेक वेळा संपर्क करूनही विहित वेळेत ते हजर झाले नाहीत. त्यामुळे खर्च निरीक्षक यांना श्रीमती मुंडे यांचे खर्च विषयक अभिलेख तपासणी करता येऊ शकले नाहीत. ही कृती निवडणूक आयोगाच्या सूचनांचा भंग करणारी आहे. सदर दिवशी उमेदवार अथवा त्यांच्या प्रतिनिधीनी तपासणीसाठी निवडणूकीच्या खर्चाची नोंदवही अभिलेख सादर केले नसल्याने लोकप्रतिनिधी अधिनियम १९५१ चे कलम ७७ अन्वये निवडणूक खर्चाचा हिशेब ठेवण्यात कसूर केल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे उमेदवाराने स्वतः अथवा प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत ४८ तासाच्या आत निवडणूक खर्चाचा हिशोब विलंबाच्या कारणासह सादर करावा, अन्यथा उमेदवारावर भारतीय दंड संहितेचे कलम १७१ 'झ' अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची गांभीर्याने नोंद घ्यावी, अशी नोटीस जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी संबंधित उमेदवारास जारी केले आहे. यासह ताटे महेंद्र अशोक आणि सलीम अल्लाबक्ष सय्यद या उमेदवारांना ८ मे रोजी खर्चाची नोंदवहीच्या लेखांची तपासणी करण्यात कसूर केल्याबद्दल लोकप्रतिनिधी अधिनियम १९५१ चे कलम ७७ अन्वये भंग केल्याचे दिसून आल्याचे कारण दाखवून नोटीस जारी केले असून उमेदवाराने स्वतः अथवा प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत ४८ तासाच्या आत खर्चाचा हिशोब विलंबाच्या कारणासह सादर करावा, अन्यथा भारतीय दंड संहितेचे कलम १७१ 'झ' अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी कळविले आहे. भारतीय जनता पक्षाच्या उमेदवार पंकजा मुंडे, यांना आणि नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाचे उमेदवार बजरंग सोनवणे या दोन उमेदवारांना तपासणीसाठी सादर केलेल्या निवडणूक कर्जातील तफावती बाबत नोटीस जारी करण्यात आलेली आहे. बजरंग मनोहर सोनवणे यांनी दि. ३ ते ६ मे २०२४ पर्यंत सादर केलेल्या एकूण खर्चाची रक्कम ४ लाख ७५ हजार ३८१, (४,७५,३८१) एवढी असून खर्च निरीक्षक कार्यालयाच्या छायांकित निरीक्षण नोंदवहीनुसार नोंदविण्यात आलेल्या एकूण खर्च रक्कम ९ लाख ३ हजार ३१८ (९,०३,३१८) एवढी आहे. यामध्ये छायांकित नोंदवहीनुसार झालेल्या खर्चाचा विचार करता उमेदवाराकडून ४ लाख २७ हजार ९३७ (४,२७,९३७) त्यांच्या लेख्यात कमी दर्शविलेली आहे. पंकजा गोपीनाथ मुंडे यांनी ०२ ते ५ मे २०२४ पर्यंत सादर केलेल्या एकूण खर्चाची रक्कम ३ लाख १५ हजार ७१८ (३,१५,७१८)आहे. तर कार्यालयाच्या छायांकित निरीक्षण नोंदवहीनुसार नोंदविण्यात आलेल्या एकूण खर्चाची रक्कम ७ लाख ४३ हजार ३२७ (७,४३,३२७) आहे. छायांकित नोंदवहीनुसार झालेल्या खर्चाच्या विचार करता उमेदवाराकडून ४ लाख २७ हजार ६०९ (४,२७,६०९) रक्कम त्यांच्या लेखात तफावत दर्शविली आहे. याकरिता दोन्ही उमेदवारास लोकप्रतिनिधी अधिनियम १९५१ च्या कलम ७७ प्रमाणे निवडणूक कालावधीत प्रत्येक उमेदवार स्वतः उपस्थित राहून किंवा त्यांच्या निवडणूक प्रतिनिधी द्वारे निश्चित तारीख केस नामनिर्देशित झालेल्या व त्याचा निकाल जाहीर झाल्याची तारीख दोन्ही तारखांसह या दरम्यान त्यांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी निवडणुकीच्या संबंधातील सर्व खर्चाचे स्वतंत्र व अचूक लेखी ठेवतील अशी तरतूद आहे. या दोन उमेदवारांचे सदर तरतुदीचे पालन न केल्यामुळे त्यांना नोटीस जारी करण्यात आलेली असून ४८ तासाच्या आत खुलासा सादर करण्यात लावलेला आहे. अन्यथा लोकप्रतिनिधी अधिनियम १९५१ चे कलम ७७ अनुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी कळविले आहे.

ड्रग्सवर कारवाई न करण्याच्या सूचना केंद्रातून कोणी दिल्या?

प्रकाश आंबेडकर यांचा खोचक सवाल

मुंबई । प्रतिनिधी

ड्रग्सचा साठा नाशिक ते लोणावळा या दरम्यान आहे. परंतु, अजूनही तिथे छापा होत नाही. देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रातील जनतेला सांगावे की, त्यांना केंद्रातील कोणत्या मंत्र्यांकडून सूचना आहे की, यावर कारवाई करू नये? असा खोचक सवाल वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी मुंबई येथील पत्रकार परिषदेत केला. हे ड्रग्स कमी किमतीचे नाहीत, तर तब्बल दहा हजार कोटींचे हे ड्रग्स असल्याचेही या वेळी त्यांनी सांगितले.

ॲड. प्रकाश आंबेडकर म्हणाले की, १९९३ मध्ये ब्लास्ट झाला त्यावेळी ड्रग्सचा पैसा वापरण्यात आला होता. ड्रग्सचा जो व्यवहार चालला आहे तो एक संघटित गुन्हा आहे आणि दहशतवादाशी संबंधित आहे. २०२१ मध्ये मुंद्रा पोर्टवर एनआयएमार्फत नार्कोटीक्स सिझ झाले होते. त्याच्यामध्ये अतिरिक्त चार्जशीट दाखल करण्यात आली. त्या अतिरिक्त चार्जशीटमध्ये एनआयएने सिद्ध केले आहे की, ड्रग्सचा पैसा हा लष्कर- ए तोयब्बा या संघटनेसाठी पुरवला गेला होता असेही यावेळी सांगितले. पुढे बोलताना प्रकाश आंबेडकर म्हणाले की, मध्यंतरी एक बातमी आली होती की, पोर्ट बंदरवर १८ हजार कोटींचे ड्रग्स सापडले होते. हे ड्रग्स कोणत्या एजन्सीच्या ताब्यात आहेत? नार्कोटीक्सच्या ताब्यात आहेत, एनआयएच्या ताब्यात आहे, ईडी की सीबीआयच्या ताब्यात आहे याची कुठेही माहिती मिळत नाही. हा दहा हजार कोटींचा ड्रग्स साठा नाशिक, लोणावळा येथे आहे. तो यापैकी आहे का? याचा खुलासा झाला पाहिजे. या मादक सेवनाला तरुण पिढी बळी पडत आहे या मुद्याकडेही यावेळी त्यांनी लक्ष वेधले. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ड्रग्स प्रकरणावर कारवाई का झाली नाही याची माहिती जनतेला सांगावी, अशी मागणीही प्रकाश आंबेडकर यांनी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने केली.

'पीएम मोदींच्या वक्तव्याने अमित शहा घाबरलेत'

अदानी-अंबानी मुद्द्यावरुन काँग्रेसचा भाजपला टोला

नवी दिल्ली। वृतसंस्था

लोकसभा निवडणुकीत पराभव समोर दिसत असल्याने पंतप्रधान नरेंद्र मोदींना अदानी-अंबानी, काळापैसा, भ्रष्टाचार याविषयी बोलावे लागत असल्याची टीका काँग्रेसने केली. तसेच पंतप्रधानांच्या वक्तव्याने अमित शाहही घाबरलेत, असा टोलाही काँग्रेसने लगावत अदानी-अंबानी मुद्द्यावरून पुन्हा एकदा पंतप्रधान नरेंद्र मोदींवर पलटवार केला. १० वर्षे भ्रष्टाचारात बुडाल्यानंतर नरेंद्र मोदींनी बुधवारी धाडस दाखवत भ्रष्टाचारावर मोठा खुलासा केल्याचा खोचक टोलाही काँग्रेसने लगावला.

देशात लोकसभा निवडणूकीचे ३ टप्पे संपल्यानंतर, चौथ्या टप्प्यातील प्रचाराने भ्रष्टाचाराच्या मुद्द्याकडे वळण घेतले आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी नेहमी पंतप्रधान मोदींवर अदानी-अंबानीचे मित्र म्हणून टीका करत असतात. परंतू निवडणूकीच्या प्रचारात पंतप्रधान नरेंद्र मोदींनीच राहुल गांधीवर अदानी-अंबानीवरुन टीका केली. त्यामुळे पंतप्रधानांच्या या विधानाची राजकीय वर्तुळात चर्चा होत आहे. पंतप्रधान मोदींच्या वक्तव्यावर राहुल गांधींनी बुधवारी जोरदार पलटवार केला होता, त्या पाठोपाठ गुरूवारी काँग्रेसनेही याच मुद्द्यावरून पुन्हा मोदींना घेरले. काँग्रेस प्रवक्त्या सुप्रिया श्रीणेत यांनी गुरुवारी (दि.९) दिल्लीतील काँग्रेस मुख्यालयात पत्रकार परिषद घेतली. यावेळी सुप्रिया श्रीणेत म्हणाल्या की, 'पंतप्रधान नरेंद्र मोदी भाजपचा पराभव पाहता भ्रष्टाचाराचे आरोप करत आहेत. या देशाचे पंतप्रधान इतके दुबळे यापूर्वी कधीच नव्हते. १० वर्षे भ्रष्टाचारात बुडाल्यानंतर नरेंद्र मोदींनी धाडस दाखवत भ्रष्टाचारावर मोठा खुलासा केला. राहुल गांधींना पाहून नरेंद्र मोदींना ही हिंमत आली आहे,' असा टोलाही श्रीणेत यांनी लगावला. सुप्रिया श्रीणेत पंतप्रधानांवर आरोप करताना म्हणाल्या की, 'पंतप्रधान मोदींनी भ्रष्टाचाराबाबत खुलासा केल्याने संपूर्ण भाजप आणि सरकारमध्ये खळबळ उडाली आहे. भाजपचे लोक घाबरले आहेत कारण त्यांना माहित आहे की पंतप्रधान मोदी पराभव पाहून अदानी-अंबानीविषयी बोलू शकतात, तेव्हा आपण काय आहोत? सरकारमध्ये अमित शहा सर्वाधिक घाबरले आहेत. शिवाय जे सरकारी अधिकारी पंतप्रधान मोदींच्या सूचनेनुसार काम करत होते तेही घाबरले आहेत.'

पान १वरून...

पंकजाताईसाठी नितीन

सरकारने हाती घेतला.भाजप सरकारच्या मंत्रिमंडळातील कार्यकुशल प्रमुख मंत्री व विकासपुरुष म्हणून ज्यांची ओळख आहे.ज्यांच्या मुळे देशभरात ऐतिहासिक महामार्गांचे महत्त्वकांक्षी प्रकल्प व रस्त्यांचे जाळे निर्माण झाले आहे. नवनवीन विकास संकल्पना कार्यान्वित झाल्या आहेत.असे नितीन गडकरी हे पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारासाठी बीड जिल्ह्यात येत आहेत. माजलगाव येथे होणारे या जाहीर सभेला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन भारतीय जनता पक्ष महायुती प्रचार समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

लोकसभेला बजरंग बप्पा निवडून येतील,

बजरंग सोनवणे यांच्या प्रचारार्थ राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे (शरदचंद्र पवार युवक प्रदेशाध्यक्ष महबूब शेख व तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेला तालुकाभरातून उदंड प्रतिसाद मिळाला असून सभास्थळी कार्यकर्ते, मतदार बाधवांची मोठी गर्दी दाटली होती. या सभेला संबोधित करताना जयंत पाटील बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले, शिरूर कासार तालुका शरद पवार यांच्या विचाराशी बांधलेला तालुका आहे. या तालुक्यातलं उमग नेतृत्व म्हणजे महेबुब शेख हे शरद पवार साहेब यांच्या विश्वासातला एक व्यक्तिमत्व आहे. महेबुब शेख यांनी आपल्या फिरण्यातून गाव पातळी पासून तर राज्य पातळीवर आपली राजकीय कारकीर्द वाढवली आहे पवार साहेबावर त्यांची मोठी निष्ठा आहे आणि राजकारणामध्ये निष्ठेला मोठी किंमत आहे. यामुळे निश्चितच महेबुब शेख यांचे भवितव्य उज्वल आहे. बीड जिल्ह्याचा विकास हा बजरंग बाप्पांच्या विजयानंतर होऊ शकतो. प्रचाराच्या निमित्ताने जिल्हाभर फिरत असताना जिकडेतिकडे बजरंग बाप्पाच्या बाबतीत लोक अनुकूल असल्याचे दिसून येत आहेत. यामुळे बीड लोकसभा निवडणुकीमध्ये बजरंग बप्पा निवडून येतीलच पण आगामी विधानसभा निवडणुकी आपलेच सरकार असा आत्मविश्वास प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी शिरूरच्या सभेत व्यक्त केला आहे .यावेळी व्यासपीठावर युवक प्रदेशाध्यक्ष मेहबुब शेख,माजी आ. साहेबराव दरेकर, अमोल तरटे, मदन जाधव,बाळासाहेब नागरे,भिमराव गायकवाड, अजिनाथ खेडकर,सोपान मोरे,बाबुराव झिरपे,अमोल चव्हाण,नशिर शेख,सय्यद पठाण,सागर गाडेकर,दिनेश गाडेकर,बाळासाहेब गायकवाड,गणेश मोरे,असिफ शेख,बाळासाहेब काटे,राजेंद्र घोरपडे, अजिनाथ पावसे आदींची उपस्थिती होती,

जातीपातीच्या राजकारणामुळे विकास रखडला - महेबुब शेख

बीड जिल्ह्यामध्ये निवडणूक लागली की जातीपातीच्या राजकारणाला ऊत येतो. तालुक्यातीलच नव्हे तर जिल्ह्यातील जनतेला जातीपातीच्या राजकारणात ओढून भावनिक केले जाते. भावनिक झालेल्या या मतदार बांधवांमुळे आज पर्यंत तालुक्याचा विकास रखडला आहे. तालुक्यावर कायम दुष्काळजन्य परिस्थिती आहे. माझ्या बालपणापासून ऊसतोड कामगार मुक्त तालुका हे आश्वासन मी ऐकत आलो आहे. मात्र या तालुक्याच्या श्वासात विकासाला अद्याप कोणी हात घातला नाही. आगामी लोकसभा निवडणुकीमध्ये बजरंग बप्पा सोनवणे यांना निवडून दिल्यास तालुक्याचा निश्चित विकास होईल. रखडलेल्या विकासाला चालना देण्यासाठी बजरंग बप्पा ला निवडून द्या असे मतदार बांधवापुढे महेबुब शेख यांनी साकडे घातले.

पुण्यात मुसळधार, मराठवाड्यात

दारव्हा, दिग्रस, पुसद, महागाव, नेर या तालुक्यांमध्ये वादळी वारा, विजांच्या कडकडाटसह अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. चंद्रपूर शहर आणि जिल्ह्यातही मुसळधार पावसाने हजेरी लावली. सलग दोन दिवस चंद्रपुरात मुसळधार पाऊस अनुभवला जात आहे. शहरातील बिनबा गेट ते आंबेडकर पुतळा मार्गावर पाणी देखील जमा झाले. वाशीम जिल्ह्यात सलग दुसऱ्या दिवशी वादळी वाऱ्यासह पावसाची हजेरी लावली. वाशिमच्या जांब गावात एका १४ वर्षीय दुर्गा कांबळे नामक बालिकेचा वीज कोसळून दुर्दैवी मृत्यू झाला. तर दुसरी बालिका रविना सुर्वे ही गंभीर जखमी झाली आहे. घरासमोरील ओट्यावर खेळत असताना अंगावर वीज कोसळल्याची घटना घडली. हिंगोली जिल्ह्यांमध्येही वादळी वारे आणि अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. जिल्ह्यातील हिंगोली आणि कळमनुरी शहरासह ग्रामीण भागात अवकाळी पावसाचे आगमन झाले. हवामान विभागाने नाशिक, अहमदनगर, पुणे, सांगली, सोलापूर, औरंगाबाद या भागात पावसाचा यलो अलर्ट दिला होता तर सातारा, कोल्हापूर, जळगाव नंदुरबार, धुळे या जिल्ह्यात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता व्यक्त केली होती. गुरूवारी संध्याकाळच्या सुमारास बीड शहरासह जिल्ह्यात काही ठिकाणी पावसाने हजेर लावली. या पावसामुळे उकाड्यापासून नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला आहे. मात्र, अवकाळी पावसामुळे पालेभाज्या आणि फळबागांचे नुकसानही होत आहे.

मराठा समाजाचे अगोदरच ठरले

उमेदवार अशोक हिंगे अशी तिरंगी लढत होणार आहे. पंकजाताई मुंडे यांच्याकडे मराठा समाजातील मोठे नेते आहेत, तर बजरंग सोनवणे यांच्या बाजूने समाज असल्याचे चित्र आहे. शिवाय वंचितचे अशोक हिंगे यांनीही मुंडे-सोनवणे यांना कडवी झुंज देण्याची तयारी ठेवली आहे. त्यानुसार त्यांनी अलिकडच्या दोन दिवसात प्रचारात आघाडी घेतली आहे. दि. ८ मे रोजी प्रकाश आंबेडकर यांनी हिंगे यांच्यासाठी बीडमध्ये सभा घेतली. या सभेचा हिंगे यांना फायदा होताना दिसत असून बीड शहरातील मराठा व मुस्लिम समाज आपल्या बाजूने आकर्षित करण्याचा हा प्रयत्न किती यशस्वी होतो, हे मतमोजणीनंतरच कळेल. मराठा समाजाला आपल्या बाजूने घेण्यासाठी पंकजाताई मुंडे यांनी जोरदार प्रयत्न केले. त्यांना बऱ्याच गावात विरोध झाला मात्र पुढे विरोधाची धार काही प्रमाणात का होईना बोथट झाली असल्याचे दिसते. शिवाय मुस्लिम समाजाची मते मुंडे यांना यावेळी जास्त पडणार नाहीत, असेही म्हटले जात आहे. वंजारी समाजासह ओबीसी समाज मात्र मुंडे यांच्या पाठीशी असल्याचे दिसते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची दि. ७ मे रोजी सायंकाळी आंबाजोगाईत सभा पार पडली. या सभेमुळे पंकजाताई मुंडे यांना काही तोटा तर काही फायदा होणार असल्याचे दिसते. कोणाच्याच आरक्षणाला धक्का लागणार नाही, अशी भुमिका मोदी यांनी घेतल्याने ओबीसी आणि मागासवर्गीय समाजाचा कल आता पंकजा मुंडे यांच्या बाजूने झुकेल, असे बोलले जात आहे. तर मराठा आरक्षणावर न बोलल्याने आणि मुस्लिम समाजाला टार्गेट केल्याने हे दोन्ही समाज भाजपपासून या निवडणुकीत दुर जातील, अशी चर्चा आहे. ओबीसी समाज सोबत आल्याने पंकजाताई मुंडे यांचे सध्या तरी पारडे जड झाल्याचे दिसत असून पंकजाताई मुंडे यांना निवडून आणण्यासाठी आता ओबीसी समाजाची वज्रमुठ आवळली असल्याचे दिसत आहे. अशोक हिंगे हे मराठा समाजाची मते किती घेतात? यावरच बजरंग सोनवणे यांचे भवितव्य अवलंबून आहे. बीड जिल्ह्यातील मागासवर्गीय समाज नेमकी काय ? भुमिका घेतो, याकडेच सर्वांचे लक्ष लागले आहे.

बीड जिल्ह्याच्या विकासासाठी

सभा दि. ९ मे रोजी पार पडली. यावेळी जयंत पाटील, अनिल देशमुख, राजेश टोपे, फौजीया खान, खा. रजनीताई पाटील, आ. संदिप क्षीरसागर, राधाकृष्ण पाटील, सुरेश नवले, सुनिल धांडे, फुलचंद कराड, ईश्वर मुंडे, रत्नाकर शिंदे, परमेश्वर सातपुते, शेख महेबुब आदि उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना पवार म्हणाले, नरेंद्र मोदी हे देशाचे पंतप्रधान आहेत, मात्र या लोकसभा निवडणुकीमध्ये ते महाराष्ट्रामध्ये सारखेच सभा घेत आहेत. त्यांनी सभा घेण्यास माझा विरोध नाही पण गेल्या दहा वर्षात काय केलं आणि पुढे काय करणार आहोत हे सांगण्यापेक्षा धर्म आणि जातीवर ते भर देत आहेत. यांच्यासारख्या अनेक चांगल्या माणसांना चुकीच्या पद्धतीने जेलमध्ये टाकण्यात येत आहे. सध्या इंडिया आघाडीला देशांमध्ये अनुकूल वातावरण असून आम्ही पूर्ण बहुमताने सत्तेत येणार असल्याचे यावेळी शरद पवार म्हणाले. बीड जिल्हा हा मागासलेला आहे, जिल्ह्याचा विकास होणे आवश्यक आहे. बजरंग सोनवणे यांनी दोन कारखाने चालवताना सर्वाधिक गाळप आणि सर्वात जास्त दर ऊसाला दिला आहे. त्यामुळे विकासाची दृष्टी त्यांच्याकडे आहे. ते चांगलं काम करतील. आजच्या सभेची परिस्थिती पाहता बजरंग सोनवणे हे विजयी होऊन लोकसभेत जातील असा मला विश्वास आहे असेही शरद पवार यावेळी म्हणाले. दरम्यान गेल्या काही दिवसापासून धनंजय मुंडे यांनी शरद पवार यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला होता. त्यामुळे शरद पवार आंबेजोगाई येथील सभेत धनंजय मुंडे यांच्यासह पंकजा मुंडे यांच्या विरोधात बोलतील असे म्हटले जात होते. रेल्वेसह मराठा आरक्षणावर सुद्धा शरद पवार बोलतील अशी अपेक्षा जिल्हावासियांना होती. मात्र या कोणत्याच मुद्द्यावर शरद पवार अंबाजोगाई येथील सभेत बोलले नाहीत. त्यामुळे आता जिल्ह्यात उलट सुलट चर्चांना उधाण आले आहे.

२०१४ चा मोदींचा व्हिडिओ लावला

उत्पादन दुप्पट करण्याचे मोदींनी २०१४ मध्ये आश्वासन दिले होते. त्यांनतर देशातील प्रत्येक गरीब व्यक्तीला २०२२ पर्यंत आम्ही घरकुल देण्याचे आश्वासन मोदी यांनी दिले होते. हे दोन्ही व्हिडीओ अनिल देशमुख यांनी आपल्या भाषणादरम्यान लावायला लावले. त्यामुळे उपस्थितीतांनी यास जोरदार प्रतिसाद दिला.

बजरंग सोनवणे-

बीड जिल्ह्यात घाणेरडे राजकारण होत आहे. पवार साहेबांनी माझ्यावर दोनवेळा लोकसभेची जबाबदारी दिली. गेल्या वेळी ५ लाख ९ हजार लोकांनी मतदान केले. समोरचे लोक फक्त माझ्यावर टिका करीत आहेत. वॉटरग्रीडची मंजूरी दिली असे सांगितले. कोकण व विदर्भातून पाणी आणू असे सांगितले. पण कसे आणणार हे अगोदर पहा. जिल्हयाचे मागासलेपण दुर करण्यासाठी पंकजाताईला मत द्या, असे सांगतात, पण तुम्हीच जिल्ह्याच्या सत्तेत व राज्याच्या सत्तेत होतात. तुमच्या छोट्या भगिनी १० वर्ष होत्या त्यांनी काय केले. घाटनांदुर-आंबाजोगाई जोडा पण अगोदर घाटनांदुरला थांबा मंजुर करा. पंधरा वर्षात ६१ वर्षाचे रेल्वेचे काम झाले. पुढे २०० किमीचे काम करण्यासाठी आणखी किती पिढ्या जावू देणार आहेत. वडिलांनी चालवलेले २६ कारखाने तुम्ही बंद केले. ते का बंद केले याचे उत्तर अगोदर द्या. मजुर आणि वाहनदारांचे लाखो रुपये थकविले आहे, ते पैसे अगोदर द्या, मग बाकीचे बोला, असे आव्हान बजरंग सोनवणे यांनी मुंडे बहिण भावाला दिले. मी ११ वर्षापासून कारखाना चालवतो, मी कोणाचेही पैसे बुडवले नाही, तुम्ही तर बुडवे आहात, असे ते म्हणाले. माझ्या शेतीबाबत बोलताना धनंजय मुंडे नेहमी सांगतात, सोनवणे शेतीत काय पिकवतात. मी तुमच्या सोबत होतो त्या वेळी १५ वर्षात तुम्ही काय डोळ्याला पट्टी बांधली होती का? गोदावरी खोऱ्यात वाळू तस्करांचे धनी कोण आहेत, कोणाच्या ४०-४० गाड्या चालतात, धमक्या कोण देते? हे सर्वांना माहित आहे, असे सोनवणे म्हणाले. मी खासदार झाल्यावर मनोज जरांगे यांच्या मागणीला पाठींबा देईल, हे मी जाहीर सांगतो, असे सोनवणे म्हणाले.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शुक्रवार, दि. १० मे २०२४ ३

'दिलखुलास' या कार्यक्रमात बीडचे पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांची मुलाखत

मुंबई । प्रतिनिधी

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'दिलखुलास' कार्यक्रमात बीड जिल्ह्याचे जिल्हा पोलिस अधिक्षक नंदकुमार ठाकूर यांची 'कायदा व सुव्यवस्था ' या विषयावर मुलाखत घेण्यात आली आहे. शनिवार दि.११ मे २०२४ आणि रोजी आकाशवाणीच्या सर्व केंद्रावरून व न्यूज ऑन एआयआर' या मोबाईल ॲपवर सकाळी

७.२५ ते ७.४० या वेळेत ही मुलाखत प्रसारित होणार आहे. ही मुलाखत श्री. दत्ता देशमुख यांनी घेतली आहे.

बीड जिल्ह्यातील जिल्हा पोलिस प्रशासनाकडून निवडणूक प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडण्यासाठी सुरू असलेली कार्यवाही, जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था,जिल्ह्यात होत असलेल्या सभा आणि त्यासाठी होत असलेली कार्यवाही,आदर्श आचारसंहिता उल्लंघन करणाऱ्या विरूद्ध केलेली कार्यवाही 'याविषयी 'दिलखुलास' कार्यक्रमातून बीड जिल्ह्याचे जिल्हा पोलिस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी माहिती दिली आहे.

सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी मतदार संघात सतर्कतेने मतदान प्रक्रिया पार पाडावी -निवडणूक अधिकारी

बीड । प्रतिनिधी

बीड लोकसभा मतदारसंघातील सहा विधानसभा मतदार संघामधील सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांनी आपल्या मतदार संघात सतर्कतेने मतदान प्रक्रिया पार पाडावी असे निर्देश जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी आज दिले.

बीड लोकसभा मतदार संघात सोमवार दि. १३ मे रोजी मतदान होणार आहे. त्या अनुषंगाने आज शासकीय तंत्रनिकेतन येथे सहा विधानसभा मतदारसंघातील सहाय्यक निवडणूक अधिकारी आणि नोडल अधिकारी यांची बैठक घेण्यात आली. त्यावेळी जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी निर्देश

दिले. या बैठकीस अपर जिल्हाधिकारी डॉ. त्रिगुण कुलकर्णी, आदर्श आचार संहिता कक्ष प्रमुख तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. वासुदेव सोळंके यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक घेण्यात आली.

मतदान केंद्रात मूलभूत सुविधा असाव्यात याकडे प्रकर्षाने लक्ष देण्याच्या सूचना सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांना त्यांनी यावेळी केल्या. यामध्ये पाण्याची व्यवस्था, वैद्यकीय सुविधा, उन्हाळ्यात चा त्रास होणार नाही त्यासाठी अपेक्षित व्यवस्था, काही ठिकाणी पाळणाघरे, बसण्याची योग्य सुविधा, मंडप व्यवस्था असावी तसेच बीड जिल्ह्यात असलेल्या वैशिष्ट्यपूर्ण गोष्टींवर आधारित काही आदर्श मतदान केंद्र तयार करावेत, अशाही सूचना जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी यावेळी केल्या.

मतदानाच्या दिवशी दर दोन तासांनी सर्व मतदान केंद्रातील मतदानाची नेमकी आकडेवारी जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या कक्षापर्यंत पोहोचविण्यात यावी याची दक्षता स्वतः सहाय्यक निवडणूक अधिकारी यांनी घ्यावी अशा सूचना त्यांनी यावेळी केल्या.

मतदानाची वेळ संपल्यानंतर कंट्रोल युनिट, बॅलेट युनिट, व्हीव्हीपॅट आणि महत्त्वाची कागदपत्रे यांची सुरक्षात्मक पद्धतीने शासकीय तंत्रनिकेतन येथील स्ट्रॉंग रूम मध्ये स्वतः उपस्थित राहून आपापल्या विधानसभा निहाय कक्षात ठेवण्याचे निर्देश दिले. बैठकीनंतर शासकीय तंत्रनिकेतन या परिसराची संपूर्ण पाहणी करून योग्य त्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे, मोबाईल टावर, सुरक्षात्मक गोष्टींचा आढावा घेतला.

मतदानासाठी भरपगारी रजा अथवा सवलत द्यावी

बीड । प्रतिनिधी

निवडणुकीमध्ये मतदान करणे अपेक्षित आहे. त्यानुसार लोकप्रतिनिधीत्व कायदा, १९५१ च्या परिच्छेद १३५ (बी) नुसार मतदानाच्या दिवशी सर्वसाधारणपणे मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी खाजगी आस्थापनेच्या ठिकाणी काम करणाऱ्यांसाठी भरपगारी सुट्टी देण्यात यावी किंवा काही ठिकाणी कामाच्या तासात योग्य ती सवलत देण्यात यावी, असे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी, दीपा मुधोळ मुंडे यांच्यावतीने सरकारी कामगार अधिकारी, श्री. मुंढे यांनी केले आहे.

मागील काही निवडणुकांमध्ये असे दिसुन आले आहे, काही संस्था/आस्थापना आदी त्यांच्या कामगारांना भरपगारी सुट्टी किंवा सवलत देत नाहीत. यामुळे मतदारांना मतदानाचा हक्क बजावण्यापासुन वंचित रहावे लागते, जे लोकशाहीसाठी नकारात्मक आहे.

भारत निवडणुक आयोगाने दि. १६ मार्च २०२४ रोजीच्या प्रसिध्दी पत्रकाव्दारे लोकसभा सार्वत्रिक निवडणुक २०२४ चा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार बीड लोकसभा मतदार संघाकरिता सोमवार दिनांक १३ मे, २०२४ रोजी मतदान होणार आहे. सदर मतदान क्षेत्रात मतदार असलेले कामगार/ कर्मचारी यांना त्यांचा मतदानाचा हक्क योग्य रीतीने बजावता यावा, यासाठी शासन परिपत्रक दिनांक ०५ एप्रिल २०२४ अन्वये भरपगारी सुट्टी जाहीर करण्यात आलेली आहे. कारखाने, दुकाने, खाजगी कंपन्या यामधील आस्थापना, सर्व दुकाने व इतर आस्थापना, निवासी हॉटेल, खाद्यगृहे, अन्नगृहे, नाट्यगृहे, व्यापार, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना तसेच माहिती व तंत्रज्ञान कंपन्या, शॉपिंग सेंटर, मॉल्स, रिटेलर्स आदींना परिपत्रक लागू आहे. अपवादात्मक परिस्थितीत कामगार / कर्मचारी यांना पूर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसेल तर मतदान क्षेत्रातील कामगारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुट्टी ऐवजी केवळ दोन ते तीन तासांची सवलत देता येईल. मात्र, याबाबत जिल्हाधिकारी यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील.

दक्षता कक्ष स्थापन

नमूद केल्यानुसार सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने इत्यादींच्या मालकांनी / व्यवस्थापनाने सूचनांचे योग्य ते अनुपालन होईल याची काटेकोरपणे खबरदारी घ्यावी. या अनुषंगाने प्राप्त होणा-या तक्रारीचे निवारण करण्याकरिता सरकारी कामगार अधिकारी, यांचे कार्यालय आदर्श नगर, डि. पी. रोड, बीड येथे दक्षता कक्ष स्थापन करण्यात आलेले आहे. असे सरकारी कामगार अधिकारी, गुं. मुंढे यांच्याकडून कळविण्यात आलेले आहे.

उन्हाच्या दाहकतेचा दुग्ध व्यवसायावर परिणाम

जनावरांच्या चारा-पाण्याची गंभीर समस्या

अंबाजोगाई । प्रतिनिधी

रोज तापमान वाढत असून सध्या पारा ४१ अंशाच्या वर गेला आहे याचा परिणाम गायी-म्हशींच्या आरोग्यावर झाला आहे. म्हशीची दूध देण्याची क्षमता कमी झाली असून अवकाळी पावसामुळे चाऱ्याची ही नासाडी झाली आहे. एकुणच वातावरणातील बदल व उष्णतामान वाढीमुळे दूध उत्पादकतेवर परिणाम झाला आहे.

वाढत्या तापमानामुळे पाणी पातळी खालावली आहे. तालुक्यात अर्ध्यापेक्षा जास्त गावांमध्ये तीव्र पाणी टंचाई निर्माण झाली आहे. त्यामुळे गुरांना हिरवा चारा दुरापास्त झाला आहे. ढेपीच्या किमतीही वाढल्या आहेत. दुधाचा व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांना महागाईसह अडचणीचा सामना करावा लागत

आहे. वातावरणात बदल झाल्यामुळे तसेच उष्णतामान वाढल्यामुळे म्हशीचे व इतर गुरांचे आजारही वाढले आहेत. काही शेतकरी शेतीला जोडधंदा म्हणून एक किंवा दोन म्हशी सांभाळून दुधाचा व्यवसाय करतात. दुधाळू म्हशी निम्म्यावर येऊन ठेपल्या आहेत. त्यामुळे या महिन्यात काही शेतकऱ्यांनी दूध विक्री बंद केली आहे, परंतु ज्यांचा मुख्य व्यवसाय दुधाचा आहे त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. ढेपीप्रमाणे चाऱ्याचे भावही गगनाला भिडले आहेत. तसेच यावर्षी उन्हाळ्यामध्ये सतत पडत असलेल्या पावसामुळे चाऱ्याची मोठ्या प्रमाणात नासाडी झाली आहे. टंचाई व महागाईमुळे गुरांच्या चाऱ्याचे नियोजन कसे करावे? असा प्रश्न दूध उत्पादक शेतकऱ्यांना पडला आहे.

उन्हामुळे म्हशी कुटार खात नसल्यामुळे ढेप जास्त चारावी लागत आहे. तरीही प्रत्येक म्हशीचे दोन ते तीन लिटर दूध कमी झाले आहे असे शेतकरी सांगतात. यामुळे दुध डेअरीला दुध पुरवण्याऱ्यांची संख्या कमी झाली. दयानंद माने, दुध डेअरी चालक, श्रीपतरायवाडी

इंधन दरवाढीमुळे शेतीचे नियोजन कोलमडले

अंबाजोगाई । प्रतिनिधी

तंत्रज्ञानाच्या आधुनिक युगात बैलजोडीची जागा ट्रॅक्टरने घेतली आहे. शेतकरी शेतात नांगरणीसह इतर कामे बैल जोडीने न करता ट्रॅक्टरने करून घेत आहे. परंतु इंधनाचे दर वाढल्याने याचा सर्वाधिक मोठा फटका शेतकऱ्यांसह सर्वसामान्य नागरिकांना बसला आहे.

शेतकरी शेतीतील कामे लवकर पुर्ण करण्याच्या हेतून ट्रॅक्टरचा वापर करीत आहेत. भाडेतत्त्वावर शेतीचे काम करणाऱ्या ट्रॅक्टर मालकांनी नांगरणी, वखरणी, रोटावेटर, जमीन सपाटीकरण इत्यादी विविध कामांच्या दरात एकरी चारशे ते पाचशे रुपयांचा दर वाढवल्याने, शेतकऱ्यांचे शेतीचे नियोजन कोलमडले आहे.

ट्रॅक्टर सोबत विविध अवजारे व साहित्य साधनांचा वापर होत असून, त्यासाठी डिझेल वापरले जाते. यंत्रामुळे शेतकऱ्यांची वेळेची व परिश्रमाची बचत होत असली तरी, इंधन दरवाढीने शेतीसाठी लागणारा खर्च भरमसाठ वाढला आहे. डिझेल दरवाढीमुळे ट्रॅक्टर मालकांनी नांगरणी, वखरणी, रोटावेटर यासह विविध कामांचे दर वाढवले आहेत. जे काम पाच वर्षांपूर्वी पाचशे रुपये एकरणे किंवा पाचशे रुपये तासाने केले जायचे, त्या कामाचे दर आता हजार आठशे ते दोन हजार रुपयांवर गेल्याने, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना शेती मशागत करणे फारच अवघड झाले आहे. दरवर्षी नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी परेशान आहे. यातच गगनाला भिडलेली महागाई यामुळे शेतकऱ्यांना जगणे मुश्किल झाले आहे.

शेती व्यवसाय आला तोट्यात

गत पाच ते सहा वर्षापासून शेतकरी नापीकेने त्रस्त असून, त्यातच यावर्षी मशागतीचे दर वाढल्याने शेती व्यवसाय तोट्यात आला आहे. बाजारात शेतमालाला मातीमोल भाव मिळत आहे. शासनाने याकडे लक्ष देत शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेणे गरजेचे आहे.

पंकजाताईंच्या बैठकावर बैठका

बीड । प्रतिनिधी

महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांनी गुरुवारी बीड शहरामध्ये जालना रोडवर असलेल्या हॉटेल अन्विता येथे विविध समाजघटकांच्या बैठका घेतल्या. या बैठकांमध्ये त्यांनी स्वत:साठी समर्थन मागितले.

गुरुवारी सकाळपासूनच बीड शहरामध्ये महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या बैठकांचा धडाका चालू होता. शहरातील जालना रोडवर ओबीसी समाजाच्या छोट्या छोट्या जातींच्या प्रतिनिधींच्या बैठका घेवून त्यांच्याशी संवाद साधण्यात आला. यावेळी पंकजाताई मुंडे यांनी लोकसभा निवडणूकीसाठी समर्थन मागितले.

वडार समाज बाप्पांचा विजय घडवणार

बजरंग बली आम्ही आध्यत्मिक आणि राजकीय अस्मिता -दीपक चौगुले

बीड । प्रतिनिधी

वडार समाज दगड फोडणारा , काबाड कष्ट करणारा आणि मुख्य प्रवाहापासून दूर असलेला हा समाज विकासाच्या समीप आणेल असा शब्द देत बजरंग सोनवणे यांनी बीड शहरातील इमामपूर रोड वर झालेल्या प्रचार सभेत समाजाला कधी विसरणार नसल्याचे सांगितले यावेळी समाज सेवक दीपक चौगुले यांनी आम्ही दगडातून देव घडवतो आता आम्ही बाप्पा च्या रूपाने खासदार घडवू असे म्हटले .

बार्शी नाका भागात वडार समाजातील बांधवांच्या समवेत बजरंग सोनवणे यांनी तुतारी वाजवणारा माणूस हे चिन्ह घेऊन मते मागितली . आपन समाजाचे प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी आपली खासदारकी पणाला लावू.

यावेळी दीपक चौगुले यांनी पोटतिडकीने समाजाचे प्रश्न मांडले . आम्ही मुख्य प्रवाहात नाहीत आपण आम्हाला मदत करा असे आवाहन केले यावेळी व्यासपीठावर उमेदवार बजरंग सोनवणे , शेकाप चे नेते भाई मोहन गुंड , डॉ हर्षदा सोनवणे , गंगाधर गाडे यांचे संघटनेचे प्रदेश अध्यक्ष धम्मा कांडेकर युवक अध्यक्षा विद्याताई जाधव आदींची उपस्थिती होती .

लहान लहान समुदाय तुतारी वाजवू लागले

भाजपने आजवर केवळ आमचा वापर केला मोठया समुदायाची भीती दाखवायची आणि मते घाययची असे राजकारण होत आले आहे मात्र यावेळी आम्ही चुकणार नाही असे म्हणत बलुते ओबीसी आणि कष्टकरी समुदाय बजरंग सोनवणे यांना पाठिंबा देताना दिसत आहेत

पान ६ वरून...

बजरंग सोनवणे यांना

हे सरकार शेतकरी विरोधी आहे. दिल्लीच्या सीमेवर आपल्या हक्काच्या हमी भावा साठी आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यावर भयानक अत्याचार करत आहे या आंदोलन दरम्यान ७०० शेतकऱ्यांचा मृत्यू झाला आहे याचा बदला घेण्यासाठी भाजपच्या विरोधात मतदान करा कृषी मंत्री असलेले बीड चे पालकमंत्री शेतकऱ्यांच्या प्रश्नावर मूग गिळून गप्प बसले आहे बहिणीच्या प्रचारा साठी रात्रंदिवस फिरत आहे पण बीड जिल्ह्यातील आत्महत्या केल्यात्या शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना साधी भेट देऊन सांत्वन केले नाही, पालकमंत्री विकासा साठी मते मागत फिरत आहे मग आजपर्यंत जिल्ह्यातील सत्ता त्यांचाच कडे होती तेंव्हा विकास का करता आला नाही. यावेळी बोलताना माजी आमदार साहेबराव दरेकर म्हणाले की आज शेतकरी देशोधडीला लावण्याचे काम भाजप सरकार ने केले आहे ह्या निवडणुकीत त्यांना धडा शिकविण्याची गरज आहे महाविकास आघाडीचे नेते शरद पवार आणि माजी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे साहेब यांच्या पाठीशी उभे राहून बीड जिल्ह्यातील लोकसभा निवडणुकीत बजरंग सोनवणे यांना प्रचंड मताधिक्याने निवडून आणा. यावेळी आष्टी तालुका प्रमुख सुभाष राऊत, विधानसभा प्रमुख नवनाथजी आटूळे, आष्टी शहर प्रमुख महेश एकशिंगे, उपतालुकाप्रमुख संदीप हाडे, उपतालुकाप्रमुख दादासाहेब लगड,तालुका संघटक ज्ञानदेव मुटकुळे, युवा सेना तालुका प्रमुख शिवप्रसाद जाधव, युवा सेना सोशल मीडिया तालुका प्रमूख साईराज पाखरे, राष्ट्रवादी युवक काँग्रेस चे तालुका अध्यक्ष ऋषिकेश दरेकर,गटप्रमुख शिवाजीराव थोरवे, रामदास मोहिते, महेश खांदवे, अखिल पठाण,गणेश राठोड,आकाश पिंगळे,ओम गुंड, दत्ता गुंड, अविनाश आमले, सचिन गुंड, संतोष गुंड व सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शेतकऱ्याच्या आत्महत्येस कारणीभूत

होणाऱ्या आत्महत्या यांना जबाबदार असलेल्या भाजपला पराभूत करा आणि इंडिया आघाडीच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून बजरंग बप्पा सोनवणे यांच्या तुतारी वाजवणाऱ्या माणसाच्या समोर बटन दाबून प्रचंड मताने विजयी करण्याचे आवाहन शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ॲड नारायण गोले पाटील, यांच्यासह भाई लक्ष्मण आप्पा चव्हाण, भाई अनंत चव्हाण, भाई विष्णू शेळके, भाई मुंजा पांचाळ, भाई राहुल सोळंके यांनी केले.

इंडिया आघाडीच्या उमेदवाराला

भाजपाच्या दिग्गज नेत्या पंकजा मुंडे यांना उमेदवारी मिळाल्यापासूनच त्यांना आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघामधून प्रचंड मताधिक्य मिळून देण्याचा विडाच भाजपा जेष्ठ नेते मा. आ. भीमराव धोंडे यांनी उचलला आहे यासाठी त्यांनी अनेक गाव गावांचा दौरा केला असून ठिक ठिकाणी जाहीर सभा घेऊन पंकजा मुंडे यांनी केलेल्या विकास कामांची माहिती देत त्या लोकसभेसाठी योग्य उमेदवार आहेत हे सांगत आहेत. यावेळी माजी आमदार गोविंद केंद्रे,जिल्हा परिषद अध्यक्षा सविता गोल्हार, तालुका अध्यक्ष साहेबराव मस्के, जिल्हा परिषद सदस्य रामराव खेडकर,सविताताई गोल्हार, पांडुरंग नागरगोजे, अण्णासाहेब मतकर,अशोक साळवे, बबन झांबरे,वाल्मीक तात्या निकाळजे,विजय गोल्हार,दिलीप हंबर्डे, मधुकर गर्जे,सय्यद चाऊस, रत्नदीप निकाळजे, प्रकाश खेडकर हरिभाऊ चौधरी,बाबुराव कदम आदी उपस्थित होते.

पान ६ वरून...

पार्लमेंट हे देशाच्या सुरक्षेचे

अशोक हिंगे पाटील यांनी केले आहे

पुढे बोलताना हिंगे पाटील म्हणाले शरद पवारांनी माझ्या विरोधात दुसऱ्या पक्षातील उमेदवार आयात करून उभा केला जो उमेदवार स्वतःची कारखानदारी आणि स्वतःची दुकानदारी चालविण्यातच मग्न असतो त्याला जनतेच्या प्रश्नाशी काहीही देणे घेणे नाही आतापर्यंत मराठा आंदोलन झाले, मुस्लिम समाजाचे शाही न बाग आंदोलन झाले, रेल्वेच्या प्रश्नावर अनेक आंदोलने झाली इथे कुठे बजरंग सोनवणे यांचा सहभाग दिसला नाही मी गेल्याने एक वर्ष मराठा समाजासाठी काम केले, मुस्लिम समाजाच्या शहीन बाग आंदोलनात सहभाग नोंदवला, दलित समाजाच्या न्याय हक्क मागण्यासाठी लढलो आयत्यावेळी कारखानदारी दुकानदारी चालविणारे उमेदवार समोर येऊन जनतेला मताचे भीक मागत आहेत यांना जनतेकडे मते मागण्याचा कसलाच अधिकार नाही असेही वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांनी सांगितले यावेळी प्रकाश आंबेडकर, उमेदवार अशोक हिंगे पाटील, सर्वजित बनसोडे,विष्णु जाधव, तय्यब जफर, मुजमिल पटेल, रमेश गायकवाड, महेश निनाळे, भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष महालिंग निकाळजे,शैलेश कांबळे, ज्ञानेश्वर कवठेकर,डॉ नितिन सोनवणे, धम्मनंद साळवे, ॲड.अनिता चक्रे,प्रा.छाया हिरवे, इंजि.विष्णु देवकाते,युनुस शेख,धम्मानंद कासारे, पुरुषोत्तम वीर,बालाजी जगतकर, अंकुश जाधव, सुदेस पोतदार भारत तांगडे,बाबुराव मस्के, प्रस्ताविक, ॲड.राजेंद्र कोरडे, सुत्रसंचालन अजय सरवदे, भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी, समता सैनिक व सर्व जिल्ह्याचे तालुक्याचे पूर्व व पश्चिम पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्ये उपस्थित होते.

भीम आर्मी संघटनेचे जिल्हाध्यक्ष सिद्धार्थ मायदळे ,तालुका सचिन देशमाने यांचा अशोक हिगे जाहिर पाठींबा

पारधी समाजाच्या महिलांचे शिष्टमंडळ भेटले अन्य अत्याचार प्रकरणी निवेदन घेऊन भेटले साहेबांनी या प्रश्न दखल घेतली.

पवार कुटुंबाने जाती पातीला थारा

काकडे शिवाजी मामडे शिवाजी बाजोड खतीजा बाबी श्रीराम जाधव माणिक माळी आदी उपस्थित होते

यावेळी बोलतांना डॉक्टर जाधव म्हणाले की लोकसभा निवडणुकीच्या महायुतीचे अधिकृत उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ आमदार लक्ष्मण पवार व पवार कुटुंब गेवराई मतदार संघामध्ये जोमाने काम करत असून आमदार लक्ष्मण पवार यांच्या नेतृत्वाखाली गेवराई मतदार संघातून पंकजाताई मुंडे यांना मोठ्या मताधिक्य देण्यासाठी आपण सर्वांनी येत्या १३ तारखेला जास्तीत जास्त मतदान करून घेऊन भटक्या विमुक्त चे प्रश्न सोडवण्यासाठी पंकजाताई मुंडे यांना लोकसभेत पाठवावे असे आव्हान डॉक्टर लक्ष्मण जाधव यांनी केले आहे

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रकाश उपळकर विलास गुंजाळ सतीश पवार आप्पासाहेब मोरे बप्पा धनवटे बालाजी जाधव राजेंद्र तापडिया शेख बाबा दाऊद पठाण समाधान मस्के दिलीप सोनवणे शेख नसीर पिंटू साळवे इर्शाद शौकत पठाण रवी मामडे राहुल मामडे सखाराम बाजोड नारायण पवार रोहिदास पवार प्रकाश बर्डे भारत बर्डे सय्यद रफिक अर्जुन चव्हाण दत्ता चव्हाण प्रभाकर भालशंकर अर्जुन बोराडे अर्जुन सोनटक्के संतोष सोनटक्के भाऊसाहेब बेदरे अनिल खांडेकर लाला सूर्यवंशी साईनाथ पाटोळे दिनकर सुतार प्रभाकर सुतार शेख मुदद्शीर,आदिनी परिश्रम घेतले आहेत तर आभार प्रकाश उपळकर यांनी मानले आहेत यावेळी कार्यकर्त्यांसह मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भारतीय जनता पार्टीच्या

कोणालाही निवडून द्या म्हणतात . केंद्र सरकारच्या जी एस टी मुळे मोठा खिशाला चाट बसत आहे . सगळ्या तरुणांनी कमळ उगवणार नाही असे मराठवाड्यात ठरवीले आहे असे वाटते . पश्चीम महाराष्ट्रात परवा मतदान झाले कुठे कमळ उगवल असे दिसत नसल्याचेही पाटील यांनी सांगितले

विकासाच्या नावाखाली

भागात बैठका घेत अनेक सभा घेतल्या आहेत. सत्ताधार्यांनी विकासाच्या नावाखाली धुळफेक केल्याचे मत माजीमंत्री प्रा.सुरेश नवले यांनी व्यक्त केले आहे. यासह भाजपाने देशात केलेली महागाई यात गॅस, पेट्रोल, किराणा सामानाचे वाढलेले दर, बांधकामांचे दर यासह इतर महत्वाच्या विषयांना त्यांनी हात घातला. सर्व सामान्यांना होणार्या अडचणींच्या अनुषंगाने माजीमंत्री सुरेश नवले बोलत असल्यामुळे लोकांना त्या बाबी आवडत आहेत. यामुळे बजरंग सोनवणे यांना वाढता पाठिंबा मिळत आहे. माजी मंत्री सुरेश नवले यांनी गाठीभेट घेत केलेल्या सभांमुळे बीड मतदार संघात महाविकास आघाडीसाठी सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे. यावेळी ग्राम व शहरातील मगर श्रीकृष्णा, आप्पासाहेब उगले, विकाय मगर, विशाल उगले, गणेश उगले, युवराज मगर, मधुकर मगर, लत्तमण मगर, प्रमेश्वर मगर, सुरेश उगले, गोविंद उगले, उद्धव उगले, श्रीमंत मगर, बंडू मगर, नाययण उगले, अविनाश रनमेल, विशंभर मगर, पोपट मगर, बाळू मगर, अभिमान उगले, राजद्र उगने, उगल बाजीराव, भारत उगले, नानाभाऊ उगले, सुरेश उगले, श्रीमराव चव्हाण, भीमराव उगल, प्रवीन उगल, मंगेश उगले, श्रीराम उगाये, सुनील उगना, प्रल्हाद चव्हाण, उगल नारायण, महादेव कुडाळकर, महादेव कुंदलकर, ज्ञानदेव उगले, सखाराम उगल, सुरेश उगले, जालदर उगल, कल्याण उगाण, माणिक उगल, श्रीकांत उगले, नामदेव लाडगे, जनार्धन उगले, सोमनाथ उगले, अभिमान चव्हाण, किशोर उगले, सूरश उगले, अभिमान चव्हाण, किशोर उगले

काँग्रेसच्या षडयंत्रात 'उबाठा'

कटाला मान्यता दिली आहे. या आघाडीच्या स्थापनेसाठी वारंवार झालेल्या बैठकांमध्ये हाच किमान समान कार्यक्रम ठरविण्यात आला असून सर्वांच्या संमतीनुसार आता यातील एकएक मुद्दे जाणीवपूर्वक उपस्थित केले जात आहेत. पुढे बोलताना केशव उपाध्ये म्हणाले की, काँग्रेसच्या विदेशी काँग्रेस शाखेचे अध्यक्ष सॅम पित्रोदा यांनी देशातील सामाजिक वर्णभेदाविषयी केलेले निषेधार्ह वक्तव्य हे इंडी आघीडीतील उबाठा गटासह सर्वांनी निश्चित केलेल्या धोरणाचाच भाग आहे, त्यामुळे उबाठा सेनेचे ठाकरे त्यावर मौन पाळणार हे साहजिकही आहे. अयोध्येत राम मंदिराची बांधणी आणि प्रभू रामाची प्रतिष्ठापना झाल्यास त्याला संघटित विरोध करण्याकरिताच इंडी आघाडीच्या नावाने हे सर्व पक्ष एकत्र आले असून सत्ता मिळाल्यास राम मंदिर रद्द करण्याचा राहुल गांधींचा मनसुबादेखील त्या आघाडीच्या किमान समान कार्यक्रमाचाच एक भाग आहे, राहुल गांधी यांनी काँग्रेसच्या काही नेत्यांसमवेत झालेल्या गुप्त बैठकांतून हाच विचार मांडल्याचा गौप्यस्फोट काँग्रेसमधून अलीकडेच बाहेर पडलेल्या एका नेत्यानेच केला असल्याने या आघाडीचा खरा चेहरा उघड झाला आहे, असेही नमूद केले. शेवटी केशव उपाध्ये म्हणाले की, देशात अस्थिरता माजविणे, जनतेमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण करणे आणि आपला राजकीय स्वार्थ साधण्यासाठी थेट पाकिस्तानधार्जिणी धोरणे राबविणे ही इंडी आघाडीची नीती उघड झाली असून, भारतातील प्रगती, समृद्धी आणि आर्थिक उन्नतीमुळे जगात वाढत असलेली भारताची प्रतिष्ठा व ताकद सहन होत नसलेल्या विदेशी शक्तींनी इंडी आघाडीमार्फत आपल्या कारवाया सुरू केल्या असाव्यात असा संशयही व्यक्त केला.

साखरेच्या २० लाख टन निर्यातीस परवानगी द्या

इस्माने केंद्राकडे केली मागणी

कोल्हापूर : यंदा समाधानकारक साखर उत्पादन असल्याने इंडियन शुगर अँड बायो-एनर्जी मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन (इस्मा) ने केंद्राकडे २० लाख टन साखर निर्यात करण्यास परवानगी मागितली आहे. अपेक्षेपेक्षा वाढलेले उत्पादन व हंगाम संपल्यानंतर शिल्लक राहिलेला साठा याची आकडेवारी देत ही मागणी केली आहे.

निर्यातीला परवानगी दिल्यास शेतकऱ्यांची शिल्लक देणी कारखान्यांना भागवता येणार असल्याचेही संघटनेने म्हटले आहे. यंदाचे साखर उत्पादन ३२० लाख टनांपर्यंत जाण्याचा अंदाज आहे. एप्रिल अखेरपर्यंत ३१४ लाख टन साखर उत्पादन झाले. अजून उत्तर प्रदेश व तमिळनाडूत हंगाम सुरू आहे. यामुळे अजूनही साखर उत्पादन वाढण्याची शक्यता आहे.

१ ऑक्टोबर २०२३ अखेर ५६ लाख टनांचा प्रारंभिक साठा होता. यंदाच्या हंगामासाठी २८५ लाख टनांचा अंदाजे घरगुती वापर होण्याची शक्यता आहे. यंदाच्या हंगामाचा अंदाज घेता ९१ लाख टन इतका उच्च साठा शिल्लक राहू शकतो. पुढील हंगाम सुरू होताना किमान तीन महिन्यांचा स्टॉक (किमान ६० ते ७० लाख टन) शिल्लक ठेवावा लागतो. सध्याचा विचार केल्यास हा साठा जादा

प्रमाणात शिल्लक राहील, अशी शक्यता आहे. जादा साखर शिल्लक राहिल्यास याचा दबाव कारखान्यांवर येऊ शकतो. शिल्लक साखरेमुळे साठविण्याचा खर्च अधिक प्रमाणात येऊ शकतो.

जागतिक बाजारात साखरेला चांगली मागणी

सध्या जागतिक बाजारात साखरेला चांगली मागणी आहे. साखरेचा विनाकारण साठा शिल्लक ठेवण्यापेक्षा त्याची निर्यात झाल्यास कारखान्यांना दुहेरी फायदा होऊ शकतो. यामुळे एकतर साखरेचा उठाव होईल आणि चांगला दर मिळाल्याने कारखान्यांची आर्थिक स्थिती सुधारेल. याचा सकारात्मक परिणाम शेतकऱ्यांची देणी देण्यावर होईल. यामुळे कोणत्याही परिस्थितीत केंद्राने साखर निर्यातीला परवानगी द्यावी, अशी मागणी 'इस्मा'ची आहे.

याचा फटका कारखान्यांना बसण्याची शक्यता आहे.

यंदा साखर उत्पादन चांगले असल्याने साखरेची निर्यात होणे अतिशय गरजेचे आहे. साखरेला चांगली मागणी आहे. याचा फायदा साखर उद्योगाला होण्यासाठी आम्ही निर्यातीसाठी परवानगी मागितली आहे. मॉन्सूनपूर्व पाऊस आणि सरासरीपेक्षा जास्त पावसाचे अंदाज आदी कारणांमुळे पुढील हंगामात साखर उत्पादन वाढू शकेल.

दिन विशेष

महत्वाच्या घटना

१८१८ : इंग्रज मराठे तह होऊन रायगड किल्ला इंग्रजांच्या ताब्यात
१८२४ : लंडनमधील नॅशनल गॅलरी सर्वसाधारण लोकांसाठी खुली करण्यात आली.
१८५७ : मिरज येथे पहिला भारतीय स्वातंत्र्य संग्रामाची पहिली ठिणगी पेटली.
१९०७ : स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी १८५७ च्या स्वातंत्र्य संग्रामाचा सुवर्णमहोत्सव लंडनमधे साजरा केला.
१९०९ : सावरकरांनी ब्रिटिशांच्या आनंदोत्सवाला प्रत्युत्तर म्हणून लंडनच्या इंडिया हाऊसमध्ये १८५७ च्या वीरांचा गौरव करणारा समारंभ आयोजित केला. त्यात त्यांनी आपल्या भाषणात त्या संघर्षाला उघड उघड स्वातंत्र्यसमर म्हटले.
१९३७ : स्वातंत्र्यवीर सावरकर यांची रत्नागिरीच्या स्थानबद्धतेतून बिनशर्त मुक्तता.
१९४० : दुसरे महायुद्ध हिटलरने हॉलंड, बेल्जिअम आणि फ्रान्सवर आक्रमण केले.
१९४० : दुसरे महायुद्ध नेव्हिल चेम्बरलेनने राजीनामा दिल्यावर विन्स्टन चर्चिल युनायटेड किंग्डमच्या पंतप्रधानपदी.
१९६२ : मार्वल कॉमिक्सने द इक्रीडिबल हल्क या मासिकाचा पहिला अंक प्रकाशित केला.
१९७९ : मायक्रोनेशिया प्रजासत्ताक बनले.
१९८१ : फ्रान्सवा मितराँ फ्रान्सचे अध्यक्ष बनले.
१९८१ : मुंबईमध्ये प्रथमच रात्रीच्या वेळी पकाशझोतात क्रिकेट सामना खेळण्यात आला.
१९९३ : संतोष यादव हि दोनदा एव्हरेस्ट पर्वत सर करणारी पहिली भारतीय महिला ठरली.
१९९४ : दक्षिण आफ्रिकेचे पहिले श्वेतवर्णीय राष्ट्राध्यक्ष नोबेल पारितोषिक विजेते नेल्सन मंडेला यांनी देशाची सूत्र हाती घेतली.
१९९७ : ७.३ मेगावॅट भूकंपाच्या तीव्र धक्क्याने इराण मधील सुमारे १५६७ लोक ठार, २३०० लोक जखमी आणि ५०००० लोक बेघर झाले.

जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१२६५ : जपानचा सम्राट फुशिमी यांचा जन्म. (मृत्यू: ८ ऑक्टोबर १३१७)
१८५५ : भारतीय गुरु आणि शिक्षक युकतेश्वर गिरी यांचा जन्म. (मृत्यू: ९ मार्च १९३६)
१८८९ : स्वातंत्र्यवीर सावरकरांचे बंधू, कादंबरीकार नारायण दामोदर सावरकर यांचा जन्म.
१९०५ : गायक व संगीतकार पंकज मलिक यांचा जन्म. (मृत्यू: १९ फेब्रुवारी १९७८)
१९०९ : आंतरराष्ट्रीय कीर्तीचे ग्रंथालयशास्त्रज्ञ, पद्मश्री, इंडियन नॅशनल सायंटिफिक डॉक्युमेंटेशन सेंटर चे पहिले संचालक बेल्लारी शामण्णा केशवन यांचा जन्म. (मृत्यू: १६ फेब्रुवारी २०००)
१९१४ : चित्रपट निर्माते ताराचंद बडजात्या यांचा जन्म. (मृत्यू: २१ सप्टेंबर १९९२)
१९१८ : रिसर्च अँड ॲनॅलेसिस विंग या भारतीय गुप्तचर संघटनेचे संस्थापक अध्यक्ष रामेश्वरनाथ काओ यांचा जन्म. (मृत्यू: २० जानेवारी २००२)
१९३१ : ज्येष्ठ गीतकार जगदीश खेबूडकर यांचा जन्म.
१९३७ : माणिक गोडघाटे उर्फ कवी ग्रेस, मराठी कवी
१९४० : प्रसिद्धी पराङ्मुख गीतकार व कवी माणिकराव गोडघाटे ऊर्फ ग्रेस यांचा जन्म. (मृत्यू: २६ मार्च २०१२)
१९८६ : बुद्धीबळपटू पेंड्याला हरिकृष्ण यांचा जन्म.

मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७७४ : फ्रान्सचा राजा लुई (पंधरावा) यांचे निधन. (जन्म: १५ फेब्रुवारी १७१०)
१८९९ : रँड वधाच्या प्रकरणी द्रविड बंधूंची हत्या केल्याबद्दल महादेव विनायक रानडे यांना फाशी.
१९८१ : विनोदी लेखक प्राध्यापक विमादि तथा विनायक माधव दीक्षित पटवर्धन यांचे निधन.
१९९८ : पत्रकार, समाजसेवक, लेखक, चरित्रकार, साधना मासिकाचे संपादक यदुनाथ दत्तात्रय थत्ते यांचे निधन. (जन्म: ५ ऑक्टोबर १९२२)
२००० : कवी नागोराव घन:श्याम तथा ना. घ. देशपांडे यांचे निधन. (जन्म: २१ ऑगस्ट १९०९)
२००१ : महाराष्ट्राचे १३ वे मुख्यमंत्री, हिमाचल प्रदेशचे राज्यपाल सुधाकरराव नाईक यांचे निधन. (जन्म: २१ ऑगस्ट १९३४)
२००२ : गीतकार सय्यद अख्तर हुसेन रिझवी ऊर्फ कैफी आझमी यांचे निधन. (जन्म: १४ जानेवारी १९१९)
२०१५ : भारतीय इतिहासकार, लेखक निनाद बेडेकर यांचे निधन. (जन्म: १७ ऑगस्ट १९४९)

बनावट बीटी कापूस बियाण्यांपासून सावध राहा

कृषी विभागाचे शेतकऱ्यांना आवाहन

पुणे : यंदाचा खरीप हंगाम अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. त्यासाठी शेतकऱ्यांची बियाणे खरेदीसाठी आणि मशागतीसाठी तयारी सुरु झाली आहे. अनेक शेतकरी सध्या चांगल्या कापूस बियाण्यांच्या शोधात असल्याचे पाहायला मिळत आहे. मात्र, असले तरी शेतकऱ्यांची फसवणूक होण्याची शक्यता अधिक आहे. कारण ऐन हंगामाच्या तोंडावर बोगस बियाण्यांचा सुळसुळाट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे बियाणे खरेदी करताना निष्काळजी केल्यास शेतकऱ्यांचे नुकसान होण्याची भीती आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी कापूस बियाणे खरेदी करताना काळजी घ्यावी, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.

राज्यात दरवर्षी शेजारील राज्यांमधून मोठ्या प्रमाणात बनावट बियाणे येते. विशेष म्हणजे मध्यवर्ती भाग असल्याने प्रशासनाला त्यावर नियंत्रण मिळवणे देखील अवघड जाते. मागील महिन्यात अर्थात एप्रिल महिन्यातच अहेरी येथे राज्य सरकारच्या कृषी विभागाने छापा टाकून १८ लाख रुपयांचे बनावट कापूस बियाणे पकडले होते. परिणामी, येत्या खरीप हंगामात बियाणे खरेदी करताना बॅच क्रमांक पाहून, पक्के बिल न घेतल्यास शेतकऱ्यांचे नुकसान होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी बियाणे खरेदी दरम्यान ही काळजी घ्यावी, असेही कृषी विभागाने म्हटले आहे. यावर्षी एप्रिल महिन्यापासूनच बनावट बियाणे शेतकऱ्यांच्या माथी मारणाऱ्या टोळ्या सक्रिय झाल्याचा कृषी विभागाचा अंदाज आहे.

फसवणूक टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी खरेदी करताना बियाण्याची गुणवत्ता व कंपनीबाबतची विश्वासार्हता या बाबी तपासणे गरजेचे आहे. दरम्यान, कोणी बनावट बियाणे विक्री करत असेल तर तात्काळ कृषी विभागाला माहिती द्यावी. संबंधित तक्रारदार शेतकऱ्यांचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल, असे आवाहनही कृषी विभागातर्फे करण्यात आले आहे. शेतकऱ्यांनी बियाणे खरेदी करताना गुणवत्तेबाबत तडजोड करु नये व फसवणूक झाल्यास विनाविलंब तक्रार करावी, असे आवाहनही कृषी विभागाने केले आहे.

गायीची फुले त्रिवेणी जात दूधासाठी फायदेशीर

महाराष्ट्रात दुग्धव्यवसायाला जोडधंद्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे. त्यातच देशासह जगभरात सध्या दुधाची मोठ्या प्रमाणात मागणी वाढत आहे. दुग्धव्यवसाय सुरु करताना पहिला प्रश्न पडतो. दूध उत्पादनासाठी गाय किंवा म्हैस घ्यावी कोणती? महाराष्ट्रातील 'फुले त्रिवेणी' ही गाय दुधासाठी सर्वात चांगली मानली गेली आहे. या जातीच्या गायीच्या मदतीने दूध व्यवसाय सुरु केल्यास शेतकऱ्यांच्या घरी दुधाची गंगा वाहण्यास मदत होणार आहे.

'फुले त्रिवेणी' ही जात म्हणजे महात्मा फुले कृषी विद्यापीठ यांनी विकसित केलेली गायीची 'फुले त्रिवेणी' जात होय. फुले त्रिवेणी ही गाईची एक सुधारित जात आहे. या गाईची सर्वात मोठी विशेषतः म्हणजे ही होलस्टेन फ्रीजियन ५० टक्के, जर्सी २५ टक्के व गीर २५ टक्के या जातींचा संकर मिळून तयार करण्यात आली आहे. 'फुले त्रिवेणी' या जातीमध्ये मूळ जातीची गाय जेवढे उत्पादन देते. तिची पुढील पिढी देखील तेवढे उत्पादन देते. या

जातीचे वळुंचे गोठीत वीर्य महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी या ठिकाणी उपलब्ध आहे. महाराष्ट्रातील हवामानात या जातीचे संगोपन फायदेशीर आहे. यामुळे तज्ञांकडून या गाईच्या संगोपनाचा सल्ला दिला जातो. त्यामुळे आता तुम्ही देखील या जातीच्या गायीच्या पालनातून मोठी आर्थिक प्रगती साधू शकतात.

वेताला किती देते दूध?

'फुले त्रिवेणी' ही गाय तीन गायींचा एकत्रित वंश असल्याने या गाईला फुले त्रिवेणी असे नाव देण्यात आले आहे. या जातीमुळे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर दूध उत्पादन मिळत आहे. ही जात एका वेतात ३००० ते ३५०० लिटरपर्यंत दूध देत आहे. तसेच 'फुले त्रिवेणी' या गायीची रोगप्रतिकारशक्ती देखील चांगली असल्याने दूध उत्पादक शेतकऱ्यांना निश्चितच फायदा होतो.

जनावरांची वाहतूक करण्यासाठी 'ईयर टॅगिंग' बंधनकारक

पुणे : जनावरांची बेकायदा वाहतूक रोखण्यासाठी 'ईयर टॅगिंग' शिवाय इतर राज्यांतील जनावरे राज्यात येण्यास बंदी घालण्यात आली आहे. येत्या १ जूनपासून याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार आहे. 'ईयर टॅगिंग' नसलेली जनावरे बाजार समित्या, आठवडी बाजार आणि गावागावांतील खरेदी-विक्री करण्यास प्रतिबंध केल्याने बेकायदा कत्तलींना आळा बसणार आहे.

केंद्र सरकारच्या पशुसंवर्धन विभागाने 'नॅशनल डिजिटल लाइव्ह स्टॉक मिशन'अंतर्गत भारत पशुधन प्रणाली कार्यान्वित केली आहे. या प्रणालीत 'ईयर टॅगिंग' (१२ अंकी बारकोड) च्या नोंदी घेण्यात येत आहेत. त्यात जन्म- मृत्यू नोंदणी, प्रतिबंधात्मक लसीकरण व औषधोपचार, वंध्यत्व उपचार, मालकी हक्क हस्तांतर यांचा

समावेश आहे. पशुवैद्यकीय संस्थांमार्फत जनावरांच्या कानात टॅग (बिल्ला) लावून त्याची भारत पशुधन प्रणालीवर नोंदणी प्रक्रिया सुरू आहे. यामुळे राज्यातील सर्व पशुधनाची सर्वंकष माहिती एका ठिकाणी उपलब्ध होईल. सर्व ग्राम पंचायती, नगर परिषदा, पालिका, महापालिकांना पशुधनाची 'ईयर टॅगिंग' करून त्यांची नोंदणी भारत पशुधन प्रणालीवर करणे बंधनकारक आहे. १ जून २०२४ नंतर 'ईयर टॅगिंग' शिवाय पशुधनास पशुवैद्यकीय संस्था, पशुचिकित्सालयातून पशुवैद्यकीय सेवा देय होणार नाहीत. कत्तलखान्यात टॅग असल्याशिवाय म्हैस वर्गीय जनावरांची कत्तल करण्यास परवानगी मिळणार नाही, असे जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ.पी.पी. नेमाडे यांनी सांगितले.

'किसान ऊर्जा मित्र' योजना शेतकऱ्यांसाठी फायद्याची

राजस्थानच्या ७ लाख शेतकऱ्यांचे वीज बील आले शून्य

पुणे : विजेची उपलब्धता आणि विजबिलामुळे शेतकरी सर्वात जास्त चिंतेत असतो. शेतकऱ्यांना कामाच्या वेळी बहुतेकदा विजेचा पुरवठा होत नाही किंवा महागड्या विजेमुळे शेतकऱ्यांना आपल्या शेतात चांगल्या प्रकारे सिंचन करता येत नाही.

शेतीचा खर्च कमी करण्यासाठी आणि शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यासाठी राजस्थान सरकारने 'किसान मित्र ऊर्जा योजना' सुरू केली होती. या योजने अंतर्गत शेतकऱ्यांना दरमहा एक हजार रुपयांची मदत मिळते. शेतकर्यांचे उत्पन्न वाढावे आणि शेतीतील त्यांचा खर्च कमी व्हावा यासाठी सरकारकडून सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. या पार्श्वभूमीवर राजस्थानमधील शेतकऱ्यांना वीज बिलावर १००० रूपयांचे अनुदान दिले जात आहे. हे अनुदान फक्त अशा शेतकऱ्यांना दिले जाते, ज्यांच्याकडे पूर्वी कोणत्याही प्रकारचे वीज बील थकीत नाही. खते, बियाणे, कीटकनाशके व इतर कारणांमुळे शेतीचे उत्पादन खर्च वाढते शिवाय पिकांच्या उत्पादनावरही परिणाम होत होता. शेतीसाठी वीजबिलाचे ओझे शेतकऱ्यांवर पडू नये या कारणास्तव राजस्थान सरकारने शेतीचा खर्च कमी करण्यासाठी आणि शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यासाठी किसान मित्र ऊर्जा योजना सुरू केली आहे. किसान मित्र ऊर्जा योजना आल्याने शेतकऱ्यांची सिंचनाची समस्या बऱ्याच अंशी कमी झाली आहे. योग्य वेळी वीज मिळाल्याने त्यांच्या पिकांच्या सिंचनाच्या गरजा पूर्ण होत आहेत. तसेच विजेवरील अनुदानामुळे हा बोजा त्यांच्या खिशावर जास्त पडत नाही. राजस्थान सरकारने दिलेल्या माहितीनुसार, सुमारे ७ लाख ८५ हजार शेतकऱ्यांचे वीज बील शून्यावर आणण्यात आले आहे.

०००

योजनेंतर्गत कसे मिळते अनुदान :

राजस्थान किसान मित्र ऊर्जा योजने अंतर्गत जर एखाद्या शेतकऱ्याचे वीज बील १००० रूपयांपेक्षा कमी असेल तर त्याचे प्रत्यक्ष बील आणि अनुदानाची रक्कम यातील तफावत त्यांच्या बँक खात्यात जमा केले जाते. हे अनुदान मिळवण्यासाठी शेतकऱ्यांला आपला वीज खाते क्रमांक आणि बँक खाते क्रमांक आधारशी लिंक करावा लागतो. हे अनुदान फक्त सामान्य प्रवर्ग ग्रामीण मीटर आणि फ्लॅट रेट श्रेणी कृषी मीटरवर देण्यात येणार आहे. फक्त राजस्थान राज्यातील शेतकऱ्यांसाठीच ही योजना आहे.

थोडक्यात

ट्रॅक्टर धडकेत एकाचा मृत्यू

परळी : ट्रॅक्टरच्या धडकेत एकाचा मृत्यू झाल्याची घटना परळी शहरालगत असलेल्या मलकापूर रेल्वे पुलाजवळ घडली असून या प्रकरणी ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार परळी तालुक्यातील मलकापूर येथील भास्कर बालासाहेब गित्ते हे रात्री ११ च्या सुमारास आपल्या मोटारसायकल वरून गावाकडे जात असताना मलकापूर रेल्वे पुलानजीक समोरील भरधाव येणाऱ्या एमएच ४४ झेड ९१४४ ची जोराची धडक दिली. या धडकेत भास्कर गित्ते हे गंभीर जखमी झाले.दरम्यान उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला असून या प्रकरणी भास्कर गित्ते यांचे बंधू निवास बालासाहेब गित्ते यांच्या तक्रारीवरून एम एच ४४ झेड ९१४४ या ट्रॅक्टर चालकाविरोधात गुरनं. १३०/२०२४ २७९,३३८,३०४(अ), ४२७ भादवीनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या प्रकरणी अधिक तपास ठाण्याचे कर्मचारी बडे हे करीत आहेत.

परशुराम जन्मोत्सवानिमित्त आज विविध कार्यक्रम

अंबाजोगाई : ब्राम्हण ऐक्य परिषद, पेशवा युवती व महिला संघटनच्या वतीने भगवान श्रीपरशुराम जन्मोत्सवानिमित्त पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती संयोजन समितीच्या वतीने दिली आहे भगवान परशुराम जन्मोत्सवा निमित्याने आज १० मे रोजी दुपारी पाच वाजता शहराच्या देशपांडे गल्ली भागातील रणझुंजार बाजीप्रभु देशपांडे चौक येथून भव्य पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून नियोजित मार्गावरून मार्गक्रमण करून पालखी सोहळ्याची सांगता होईल. सर्व समाज बांधवांनी सर्व कार्यक्रमात सहभाग नोंदवावा पालखी सोहळ्यास उपस्थित रहावे असे आवाहन मा. नगरसेवक डॉ.अतुल देशपांडे,दीनदयाळ ना.सह.बँकेचे अध्यक्ष ॲड.मकरंद पत्की, अक्षय देशपांडे,शैलेष गोस्वामी, गिरीश देशपांडे, पद्मनाभ देशपांडे,शैलेष कुलकर्णी,अमित खडके, अवधुत देशपांडे,अक्षय मोहरीर,विशाल देशपांडे, जया मुडेगांवकर, सुचिता देशपांडे, गीतांजली कुलकर्णी, आरती सोनेसांगवीकर, प्रज्ञा रामदासी,प्रणिता कुलकर्णी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

पाटोदा अखंड नाम जप यज्ञ सप्ताहाची सांगता

पाटोदा : पाटोदा येथील स्वामी समर्थ केंद्रात पुण्यतिथी निमित्त सात दिवस या ठिकाणी गुरु चरित्र व स्वामी चरित्र व जपमाळ व नवनाथ पारायण व विना वादन प्रहरे सेवा सोहळा संपन्न झाला पुण्यतिथीनिमित्त आपले मनोगत व्यक्त करताना यावेळी मार्गदर्शन करताना वडवणी येथील सेवेकरी यांनी यावेळी मार्गदर्शन सेवामार्ग बददल माहिती सांगितली व चांगले मार्गदर्शन केले. श्री स्वामी समर्थ केंद्र पाटोदा पाटोदा शहराचे नगरध्यक्षा सौ दिपाली राजु (भैय्या)जाधव यांच्या हस्ते आरती संपन्न झाली सप्ताह च्या प्रसंगी या कार्यक्रमासाठी पाटोदा शहरातील नगसेवक प्रतिष्ठीत व्यापरी शहरातील नागरीक भाविक भक्त व सेवेकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते, याप्रसंगी श्री स्वामी समर्थ केंद्रातील सेवेकरी व मोठ्या संख्येने महिला उपस्थित होते

धारूर बस स्थानकामध्ये महिलेस लुटले

धारूर : शेजारी बसलेल्या अनोळखी महिलेने सव्वा दोन लक्ष रुपयाचे सोने व नगदी रोख रुपये लुटल्याची घटना धारूर बस स्थानकात दोन मे रोजी घडली . या प्रकरणी अज्ञात महिले विरोधात चोरीचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे . स्वाती रामहारी एडके रा .मावसूद ही महिला २ मे रोजी तेलगाव येथुन मेहकर ते पंढरपुर या बसने प्रवास करत असतांना सदरील बस ही धारूरबस स्थानकावर आल्यानंतर तेथे एक अनोळखी महिला शेजारी बसमध्ये बसली .सदरील महिलेने तिच्या हातातील बॅग फिर्यादीचे बॅग वर ठेवुन नंतर तिने तिची तब्येत खराब असे सांगुन मान खाली घालुन बसली . त्या दरम्यान त्या अनोळखी महिलेने फिर्यादीच्या पिशवीची चैन उघडुन बॅगेतील पर्श पॉकेट मधील ११ ग्रॉम नेकलेस ज्याची किंमत ५७,२०० , तीन तोळेचे सोन्याने पटटी ज्याची किमत १,५३,४०० , व नगदी १३,०००रू असा एकुन २,२३,६०० रुपायाचा माल चोरून नेला आहे . स्वाती एडके यांनी दि . ८ बुधवार रोजी दिलेल्या फिर्यादी वरून धारूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे

दसरा मैदानावरील तलावाच्या सांडव्याचे काम सुरू

भिंतीमध्ये दगड गोट्यांचा वापर; मुख्याधिकारी यांचे दुर्लक्ष

धारूर। प्रतिनिधी

धारूर नगरपालिके अंतर्गत दसरा मैदानावरील तलावाच्या काम सुरू करण्यात आले आहे .सदरील काम ११ लक्ष रुपयाचे आहे .सदरील भिंत ही सिमेंट कॉंक्रीटची असून या भिंतीमध्ये मोठ्या प्रमाणामध्ये डबर , दगडांचा वापर करण्यात येत आहे .सदरील काम हे मोठ्या प्रमाणात बोगस करण्यात येत असून याकडे न.प.मुख्याधिकारी यांचे दुर्लक्ष होताना दिसत आहे .

धारूर नगरपालिकेच्या हद्दीत दसरा मैदान तलाव आहे . या तलावामध्ये उन्हाळ्यामध्ये सुद्धा मोठ्या प्रमाणामध्ये पाणीसाठा असतो .पावसाळ्याच्या दिवसात तलाव ओहरफ्लो झाल्यानंतर सदरील पाणी जाण्यासाठी सांडव्याची व्यवस्था नव्हती

.अधिकचे पाणी झाल्यास काही पाणी जवळ असलेल्या वस्तीतील घरामध्ये शिरत होते .याची दखल घेऊन या ठिकाणी तलावात सांडवा बांधकामासाठी ११ लक्ष रुपयाचा निधी मंजूर करण्यात आला होता . सांडव्याचे काम हे पन्नास फूट लांबीचे असून पाच फूट रुंदीचे करण्यात येत आहे .यासाठी बांधण्यात येणाऱ्या भिंती या दीड -दीड फूट रुंदीच्या आहेत .या भिंतीची उंची पाच फूट आहे .सदरील काम हे जे . के .कंट्रक्शन माजलगाव यांना मिळाले असून मागील चार दिवसापासून काम सुरू करण्यात आलेली आहे .सदरील काम करताना खडी , सिमेंट, लोखंड याचा वापर करणे आवश्यक आहे परंतु गुत्तेदाराकडून मोठ्या प्रमाणात विहिरीचे डबर भरण्यात आलेले आहे .डबर वापरल्यामुळे सदरील काम हे बोगस होताना उघडपणे दिसत आहे .यामुळे सदरील काम हे गुत्तेदारा कडून बोगस करण्यात येत आहे . याकडे संबंधित न . प .चे मुख्याधिकारी यांचे दुर्लक्ष होताना दिसत आहे . या कामावर नेमण्यात आलेले संबंधित अभियंता यांच्यासमोरही मोठ्या प्रमाणात दगड वापरलेले असतानाही त्याकडे त्यांची डोळे झाक होताना दिसत आहेत .सदरील कामाची वरिष्ठाकडून चौकशी करून संबंधित गुत्तेदारावर कारवाई करण्याची मागणी होत आहे .

दसरा मैदान येथे सुरू असलेल्या तलावाच्या सांडव्याचे काम सुरू करण्यात आलेले आहे . सदरील काम हे पन्नास फूट लांबीचे आहे . कामात दगड गोटे वापरल्यास संबंधित गुत्तेदारावर कारवाई करण्यात येईल .

– हरीष शिरसट, अभियंता न प धारूर

मतदानाच्या दिवशी आठवडी बाजार बंद

बीड। प्रतिनिधी

निवडणुकीमध्ये मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा तसेच मतदान शांततेत पार पडावे यासाठी सोमवार दिनांक १३ मे २०२४ रोजी बीड जिल्ह्यातील ज्या गावी, ठिकाणी आठवडी बाजार भरतात ते बंद राहतील, असे आदेश जिल्हा निवडणूक अधिकारी, दीपा मुधोळ मुंडे यांनी निर्गमित केलेले आहेत. मतदानाच्या पार्श्वभूमीवर मार्केट अँड फेअर ऍक्ट १८६२ चे कलम ५ व कलम ५ (अ) मधील तरतुदीनुसार पणन संचालक, यांनी आठवडी बाजार बंद ठेवण्यास परवानगी दिली. त्या आधारे जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी आदेश काढून मतदानाच्या दिवशी आठवडी बाजार बंद ठेवण्यास तसेच ते अन्य दिवशी भरवण्यास मान्यता दिली आहे.

बीड जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदारसंघाच्या महत्त्वाच्या तालुक्याच्या ठिकाणी आठवडी बाजार भरविण्यात येतात.

यामध्ये बीड तालुक्यातील कुक्कडगाव, पारगाव सि. या ठिकाणचे बाजार, गेवराई तालुक्यातील शेकटा, लुखामसला, सिरसमार्ग, खांडवी या ठिकाणचे बाजार, शिरूर कासार तालुक्यातील बाजार तळ शिरूर कासार, फुलसांगवी या ठिकाणचे आठवडी बाजार, पाटोदा तालुक्यातील कुसळंब येथील बाजार, आष्टी तालुक्यातील खुंटेफळ पुंडी, पांगरा, धामणगाव येथील बाजार, माजलगाव तालुक्यातील राजेगाव हा बाजार, धारूर तालुक्यातील धारूर चा बाजार, वडवणी तालुक्यातील पिंपळा रुई, देवळा बु., चिखलबीड येथील बाजार, केज तालुक्यातील बोरीसावरगाव, मस्साजोग येथील बाजार आणि परळी वैजनाथ तालुक्यातील परळी वैजनाथ येथील बाजार सोमवारी भरत असून ३९ बीड लोकसभा मतदारसंघात सोमवार दिनांक १३ मे रोजी मतदान असल्याकारणाने हे आठवडी बाजार बंद ठेवण्यात आलेले आहेत.

सोशल मीडिया हा फक्त करमणुकीचे माध्यम नसून आर्थिक उन्नतीचा मार्ग आहे - गावडे

राजमुद्रा करिअर अकॅडमीच्या विद्यार्थ्यांना केले मार्गदर्शन

म्हसोबावाडी। प्रतिनिधी

स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी माहिती तंत्रज्ञानाच्या संदर्भात सखोल अशा विषयावरती त्यांनी विद्यार्थ्यांशी चर्चा केली. त्यामध्ये आर्टिफिशियल इंटेलिजंट म्हणजे काय ? आणि त्याचा वापर कसा करावा त्याच बरोबर स्पर्धेच्या युगामध्ये कसे टिकून राहावे, यासंदर्भात व्यवस्थित उदाहरणे देऊन त्यांनी विद्यार्थ्यांना डिजिटल मार्केटिंग एक्सपर्ट आणि सोशल मीडिया कंट्रोलर हनुमंत गावडे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

समाज माध्यमांचा वापर कसा करावा आर्टिफिशियल इंटेलिजन्स म्हणजे काय? समाज माध्यमांचा वापर विद्यार्थ्यांसाठी सामाजिक जागरूकता आणि विकास या विषयावर अ. नगर राजमुद्रा करिअर अकॅडमीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना पुढे गावडे म्हणाले की सोशल मीडिया हे खूप मोठे माध्यम असून, त्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षण घेत असताना स्वतःच्या पायावरती उभा राहता येईल आणि पैशाची उपलब्धी करून घेता येईल , यासंदर्भात त्यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर सांगितले फेसबुक, इंस्टाग्राम ,, ट्विटर आणि प्रिंटरेज यासारख्या मीडियाच्या माध्यमातून आपण एखाद्या वस्तूची ब्रॅण्डिंग करून त्या माध्यमातून खूप मोठ्या प्रमाणावर पैसा निर्माण करू शकतो ही पावर फक्त सोशल मीडियामध्येच आहे या गोष्टीचे सविस्तर विवरण करून त्यांनी विद्यार्थ्यांना पटवून दिले. समाज माध्यमांचा उपयोग अधिकांशपणे सामाजिक संवादाच्या आणि सामाजिक विचारांच्या स्पष्टीकरणासाठी केला जातो, ज्यामुळे विद्यार्थ्यांना त्याच्या सामाजिक प्रभावाची उपेक्षा करून त्याचा उपयोग करून त्यांना आत्मविश्वास आणि सामाजिक जागरूकता मिळू शकते असे जिजाबाई बहुउद्देशीय शिक्षण संस्था संचलित राजमुद्रा करिअर अकॅडमीच्या संचालिका प्रा. नंदाताई पांडुळे यांनी सांगितले.

राष्ट्रीय चर्मकार महासंघच्या वतीने रोजेकर कुटुंबास आर्थिक मदत सुपूर्द

माजलगाव । प्रतिनिधी

राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी समाज कल्याण मंत्री बबनराव घोलप यांच्या आदेशानुसार धारूर तालुक्यातील चाटगाव येथील अनिता बाबासाहेब रोजेकर या महिलेच्या दोन्ही किडन्या निकामी झाल्या आहेत त्यांनी आजपर्यंत खर्च केला मात्र त्यांची अर्थीक परीस्थिती बिकट असल्याने त्यांना दवाखान्याचा खर्च ८ लाख लागणार असल्याचे डॉक्टर यांनी सांगितले आहे त्या पैकी ५ लाख रुपये शासनाकडून निधी मंजूर झाला आहे आणि ३ लाख कमी आहेत त्या साठी बबनराव घोलप यांच्या आदेशानुसार राष्ट्रीय चर्मकार महासंघाची टीम जिल्हाध्यक्ष नानासाहेब घोडके, युवा जिल्हाध्यक्ष राजेश जाधव , जिल्हा उपाध्यक्ष बालासाहेब गवळी, माजलगाव उप तालुकाध्यक्ष

सुनिता जाधव यांनी चाटगाव येथे जाऊन रोजेकर कुटुंबाची भेट घेऊन चर्चा करून पुर्ण माहीत घेतली आणि राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने १० हाजर रुपयांची नगदी मदत केली. जिल्हाध्यक्ष या नात्याने समाज बांधवांना विनंती करतो की अनिता रोजेकर यांना आपल्या मदतीमुळे जीवदान मिळेल आणि त्यांच्या कुटुंबाला आर्थिक बळ मिळेल या साठी आपणास घडेल ती मदत करावी असे आव्हान जालींदर सौंदडे,गोरख भाग्यवंत,सटवा आदाटे, बाबासाहेब खंडागळे, बाबासाहेब भाग्यवंत, अशोक कांबळे,मुंजा भाग्यवंत, अंकुश वाघमारे, बाबासाहेब रोजेकर, वैभव रोजेकर, बाबासाहेब जाधव आदींनी केले आहे

अक्षयतृतीया निमित्त अंबाजोगाईत जैन धर्मीयांचा उपवास अनुष्ठान महोत्सव

अंबाजोगाई । प्रतिनिधी

प्रतिनिधी आचार्य राष्ट्रसंत, आनंदऋषी यांचे परम पू.श्री. अक्षयऋषीजी व प.श्री. अमृत ऋषी महाराज,प.श्री.गितार्थ ऋषी महाराज यांच्या सानिध्यात अंबाजोगाईत गुरुवार व शुक्रवार रोजी अक्षयतृतीया निमित्त अंबाजोगाईत जैन धर्मीयांचा उपवास अनुष्ठान महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. तसेच गुरुवारी रात्री ''एक शाम प्रभु के नाम'' हा भक्ती संगीताचा कार्यक्रम प्रसिद्ध गायक रोहित लुंकड शेगांव यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

जैन धर्मात प्राचीन काळापासून उपवास व तपाची मोठी परंपरा आहे. राजाश्रेयांस कुमार यांनी अक्षतृतिया या दिवशी प्रथम तीर्थंकर ऋषभदेव यांचे उसाच्या रसाने हे अनुष्ठान सोडण्याचा मान मिळाला. ती परंपरा आजही जैन धर्मीयांमध्ये आजही अखंडित सुरूच आहे. याच धर्तीवर अंबाजोगाईत गुरुवार व शुक्रवार रोजी सलग दोन दिवस उपवास अनुष्ठान महोत्सव साजरा होत आहे.या कार्यक्रमासाठी अंबाजोगाईत राज्य भरातून तपस्वी व साधक उपस्थित राहणार आहेत. या निमित्ताने गुरुवारी सायंकाळी ७ वाजता एक शाम प्रभु के नाम'' हा भक्ती संगीताचा कार्यक्रम पांडुरंग लॉन्स येथे होणार आहे. प्रसिद्ध संगीतकार रोहित लुंकड (शेगांव) व त्यांचा संच हा भक्ती संगीताचा कार्यक्रम सादर करणार आहेत.

तर शुक्रवारी सकाळी ७ वाजता जैन साधक यांची भव्य शोभायात्रा छत्रपती शिवाजी महाराज चौक ते जैन स्थानक गुरुवारपेठ या मार्गावरून निघणार आहे. यानंतर अक्षयऋषीजी महाराज यांचे प्रवचन व उपस्थितीत अंबाजोगाईतील जैन बांधवांच्या उपस्थितीत उपवास अनुष्ठणाची सांगता व तपस्वी साधकांचा सन्मान होणार आहे.

मुलीही सर्वोच्च स्थान मिळवु शकतात –ज्योती अंबेकर

अंबाजोगाई। प्रतिनिधी

योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या वतीने गेल्या पंधरा वर्षापासून मुलींना आत्मनिर्भर बनविण्या साठी महिला आत्मभान प्रशिक्षण शिबीराचा उपक्रम स्तुत्य असून मुलींनी याचा फायदा घेऊन प्रगतीशिल समाज निर्माण करण्यासाठी कटीबद्ध राहून सर्वोच्च स्थान मिळवावे असे मत मुंबई येथील सहयाद्री वाहिनीच्या वृत्त निवेदिका ज्योती अंबेकर यांनी व्यक्त केले.योगेश्वरी क्रिडा प्रबोधिनी व श्रीमती कमल खुरसाळे न्यास यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या महिला आत्मभान शिबीराच्या समारोप कार्यक्रम प्रसंगी त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष डॉ.सुरेश खुरसाळे होते.

व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापुरकर, सचिव कमलाकर चौसाळकर, क्रिडा प्रबोधिनीचे मार्गदर्शक प्राचार्य भीमाशंकर शेटे, प्राचार्य पी.आर.थारकर, समन्वयक प्रा.प्रविण भोसले आदी उपस्थित होते. पुढे

बोलताना अंबेकर म्हणाल्या की, मुलींनी जिद्द बाळगून प्रतिकुल परिस्थितीत ठरविलेले ध्येय साध्य करण्यासाठी कार्यतत्पर रहावे व यशाची शिखरे पादाक्रांत करावीत असेही त्यांनी सांगितले. अध्यक्षीय समारोपात डॉ.खुरसाळे म्हणाले की, महिलांनी आपल्या क्षमतांचा विकास करून आत्मविश्वासाने वाटचाल करावी मुलींमध्ये असलेल्या सुप्तगुणांना वाव देण्यासाठी त्याचप्रमाणे त्यांना अन्यायाविरुद्ध लढण्याची ताकद मिळावी ,स्वरक्षण करता यावे यासाठी योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या वतीने गेल्या पंधरा वर्षापासून आत्मभान शिबिर आयोजित केले जाते त्यात सहभागी व्हावे असेही सांगितले. शिबिरार्थी विद्यार्थिनींनी शिबिराबाबत आपले मनोगत व्यक्त केले. शिबिरातील मुलींनी योगासने, काठी – लाठी, तलवारबाजी, कराटे इत्यादी वेगवेगळे प्रात्यक्षिके करून दाखविले. प्रशिक्षकांचा यावेळी गौरव करण्यात आला. प्रास्ताविक प्रा.प्रविण भोसले यांनी केले संचालन शिबीरार्थी विद्यार्थिनींनी तर आभार प्रा.डॉ. संपदा कुलकर्णी यांनी मानले. यावेळी संस्था पदाधिकारी, संचालक, विविध विभागाचे प्रमुख, शिक्षक, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक कार्यक्रमास उपस्थित होते.

जीवाचे अंतिम साध्य भगवंत प्राप्ती आहे -नारायण महाराज

बीड प्रतिनिधी : बीड येथील अंबिका नगर पांगरी रोड येथे श्री संत ज्ञानेश्वर माऊली श्रीक्षेत्र चाकरवाडी यांच्या प्रेरणेने व आशीर्वादाने १९ व्या श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर वर्धापन दिनानिमित्त व वैकुंठवासी हरिभक्त परायण उत्तमराव सारंगकर यांच्या सातव्या पुण्यस्मरणानिमित्त हरिभक्त परायण नारायण महाराज श्रीक्षेत्र संस्थान पिंपरी यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या हरिनाम सप्ताहात वेदशे चरित्र केले नारायणे / रांगता गोधने राखीताहे //१//या संत तुकाराम महाराजांच्या तीन चरणी अभंगातून हरिभक्तिपरायण नारायण महाराज हे भगवंतांनी केलेल्या चरित्राच्या अवस्थेचा उल्लेख सांगतात.

आपल्या अभंग बोलताना हरिभक्ती परायण नारायण महाराज म्हणाले की,

भगवंताने ज्या ज्या लीला केल्या त्या अगम्य अशा लीला आहेत .त्या सर्व लीला बाल अवस्थेतच केलेल्या असून त्यात रांगत असताना व गोकुळीत गेल्यावरही थोडे मोठे झाल्यावर केल्या आहेत. सृष्टीत सुख मिळवणं प्रत्येकाचा अधिकार आहे.

मानवी जीवनात क्रोध आला की ज्ञान नाश पावते. वैराग्य राहत नाही व तो जीव मायेत गुरफडतो. आत्मा +माया = ईश्वर होय. माणसाने क्रोध घालविला की तो विठ्ठलाची होतो. हेच आपले परम ध्येय आहे. शुक्राचार्यांनी प्रपंचाचा खेळ खेळण्यात भ्याले म्हणून त्याला नामदेवरायानी पोर ठरविले. ज्याची इंद्रिय ताब्यात आहेत त्यांनाच हा खेळ खेळता येईल व खेळ खेळून आपण गुणातीत होऊ व खरा आनंद मिळवू या. म्हणजेच आपले साध्य प्राप्ती करून घेऊ असेही ते यावेळी म्हणाले.

यावेळी गायक म्हणून हरिभक्तिपरायण पांडुरंग महाराज गुरव, अंगद महाराज सातपुते, गोरख महाराज वायभट, नवनाथ महाराज नाईकवाडे, भागवताचार्य नारायण महाराज, मृदंगमनी म्हणून ज्याच्या तर्जनी बोटात बोल काढण्याची जादुई आहे असे प्रमोद महाराज पदमुले आणि रामहरी रसाळ गुरुजी, अनंत घीगे पत्रकार दिलीप वखरे महाराज, पवळ गुरुजी, यशवंत सारंगकर, अजय सारंगकर गुरुजी, गजानन सारंगकर, मयूर सारंगकर, रामचंद्र कागदे गुरुजी, सुनील लांडगे सुनील सानप, लक्ष्मीकांत रामदासी महाराज आदी असंख्य भाविक भक्त उपस्थित होते.

विभागीय उप आयुक्त यांची परळीला भेट

परळी । प्रतिनिधी

३९ बीड लोकसभा मतदार संघाकरिता १३ मे रोजी मतदान होणार असून या अनुषंगाने विभागीय प्रशासन देखील केलेल्या नियोजनाचा आढावा घेत असून गुरुवार दि ९ रोजी विभागीय उप आयुक्तांनी परळी मतदार संघातील विविध मतदान केंद्राला भेटी देत तेथील सुविधेचा आढावा घेतला.

बीड लोकसभा मतदार संघात १३ मे रोजी मतदान संपन्न होणार आहे या अनुषंगाने मुख्य निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी दीपा मुधोल-मुंडे यांनी वेळोवेळी परळी विधानसभा मतदार संघातील लोकसभेचा नियोजनाचा आढावा घेत विविध मतदान केंद्राला भेटी दिल्या.याच पार्श्वभूमीवर गुरुवार दि ९ रोजी औरंगाबाद (छ.संभाजी नगर) विभागाच्या उप आयुक्त डॉ.सीमा जगताप यांनी आपल्या पथकासह परळी मतदार संघातील सिरसाळा व इतर मतदान केंद्राला भेटी देत तेथील उपलब्ध असलेल्या सुविधेचा आढावा घेतला. उप आयुक्त डॉ.सीमा जगताप यांच्या या भेटी दरम्यान परळी तहसीलचे नायब तहसीलदार बाबुराव रुपनर, मंडळ अधिकारी मंगल मुंडे, तलाठी एरंडे यांच्यासह बीएलओ आदी उपस्थित होते.यावेळी डॉ.जगताप यांनी उपलब्ध असलेल्या सुविधा पाहून समाधान व्यक्त करत आवश्यक त्या सूचना प्रशासनास केल्या.

दैनिक राज्य लोकतंत्र
महासंग्राम
शुक्रवार दि.१० मे २०२४ | ६

पार्लमेंट हे देशाच्या सुरक्षेचे कवच आहे येथे नीतिमता असणाऱ्या अशोक हिंगेला संसदेत पाठवा -आंबेडकर

कुठल्यातरी आंदोलनात बजरंग सोनवणे दिसले का? - अशोक हिंगे पाटील

बीड । प्रतिनिधी

पार्लमेंट हे देशाचे सुरक्षा कवच आहे इथे नीतिमत्ता असणारा अशोक हिंगे सारखा उमेदवार निवडून द्या असे आव्हान यांनी केले ते आज वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोकराव हिंगे पाटील यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत बोलत होते

पुढे बोलताना ऍड आंबेडकर म्हणाले की शरद पवार म्हणतात भाजपला हरवलं पाहिजे तर मग तुम्ही राजनाथसिहं सोबत काय गुलूगुलू गप्पा मारता देशातील जनतेला मूर्ख बनवायचे प्रताप पवारांनी आता थांबवायला हवेत पवारांचे उमेदवार निवडून दिले तरी ते उद्या भाजपाचा दावणीला जाऊन बसणार नाहीत याची शाश्वती काय शरद पवार यांच्या आयाराम ग याराम भूमिकेमुळे मराठा समाजाची प्रतिमा मलिन होत आहे बीडमधून बजरंग सोनवणे यांना निवडून दिले तरी उद्या शरद पवारांच्या सांगण्यावरून सोनवणे मोदींच्या बाजूने जाऊन बसतील कारण राष्ट्रवादीकडे नीतिमता नावाची गोष्ट उरलेली नाही. मराठ्यांचे खरे विरोधक शरद पवारच आहेत असेही प्रकाश आंबेडकर यांनी सांगितले मनोज जरांगे पाटील यांचे आंदोलन नवीन आहे १९८७ पासून अण्णासाहेब पाटील यांनी मराठा समाजासाठी आंदोलन केली आहेत मात्र सत्तेत असलेल्या शरद पवारांनी मराठा समाजाला गांभीर्याने घेतलेच नाही असे सांगितले शरद पवार चळवळ संपविणारा नेता आहे त्यामुळे एका माणसामुळे मराठा समाज बदनाम होऊ देऊ नका आंबेडकर यांनी मराठा समाजाला केले भारतीय जनता पार्टी सर्वात बरबटलेला पक्ष आहे मोदी घटना विरोधी माणूस आहे आणि

सर्वात खोटारडा पंतप्रधान आहे असा पंतप्रधान मी आतापर्यंत पाहिलाच नाही मोदीच्या या अशा वागण्यामुळे देशाची असुरक्षितेकडे वाटचाल चालू आहे मोदी देशापेक्षा स्वतःला मोठे समजत आहेत त्यामुळे मोदी आणि आरएसएस प्रणित भारतीय जनता पार्टीला सत्तेपासून दूर ठेवणे गरजेचे आहे असे सांगत देशाची पार्लमेंट (संसद) हे देशाचे सुरक्षा कवच आहे इथे नीतिमता असलेले म्हणजेच अशोक हिंगे सारखे तरुण तडफदार खासदार निवडून जाणे गरजेचे आहे असे मत ऍड प्रकाश आंबेडकर यांनी व्यक्त केले

मराठा आंदोलन, शाही न बाग आंदोलन, रेल्वे आंदोलनात बजरंग सोनवणे दाखवा आणि लाख रुपये मिळवा :- अशोक हिंगे पाटील मराठा आरक्षण आंदोलन, मुस्लिम समाजाचे शाईन बाग आंदोलन, बीड जिल्ह्याच्या रेल्वे प्रश्नावर झालेले आंदोलन यामध्ये कुठेही बजरंग सोनवणे यांचा सहभाग नव्हता असल तर मला दाखवा आणि लाख रुपये मिळवा अशा आव्हान वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार ◀◀ पान ३ वर

आरपीआय गवई गटाचा अशोक हिंगे यांना जाहीर पाठिंबा -माणिक वाघमारे

महायुती, महाविकास आघाडी हे दोन्ही पक्ष शेतकरी दिन दलित दुबळे यांची फसवणूक करणारे पक्ष आहेत यांना सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांना जाहीर पाठिंबा देऊन संसदेत पाठवणारच असंही माणिक वाघमारे यांनी सांगितले यावेळी ए आय एम चे प्रदेशाध्यक्ष एजाज बाबर आष्टी येथील गोसावी समाजाच्या महिला नेत्या, मुस्लिम समाजाच्या महिला नेत्या यांनी वंचित बहुजन आघाडीचे जाहीर प्रवेश केला.

पवार कुटुंबाने जाती पातीला थारा न देता सर्व जाती धर्माला सोबत घेऊन गावाचा विकास केला आहे -शिवराज पवार

पंकजाताई मुंडेना मताधिक्य देऊन विजयी करा- डॉ.लक्ष्मण.जाधव

गेवराई । प्रतिनिधी

येऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने गेवराई विधानसभा मतदारसंघातून आमदार लक्ष्मण आण्णा पवार यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टीच्या अधिकृत उमेदवार पंकजाताई मुंडे यांना प्रचंड मतांनी निवडून आणण्यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी प्रयत्न करावेत तसेच गेल्या दहा वर्षांमध्ये पंकजाताई मुंडे व आमदार लक्ष्मण आण्णा पवार यांनी गेवराई विधानसभा मतदारसंघांमध्ये मोठ्या प्रमाणात विकास केलेला आहे व विकासाच्या अनेक मोठाले

पंकजाताई मुंडेच्या प्रचारार्थ शिवराज पवारांच्या उपस्थितीत कॉर्नर बैठक संपन्न

प्रकल्प आणण्यासाठी पंकजाताई मुंडे लोकसभेत जाणे आवश्यक आहे त्यामुळे पंकजाताईला मताधिक्य देण्याची जबाबदारी अण्णांनी स्वीकारलेली आहे त्यामुळे सर्वांनी एक दिलाने काम करून येणाऱ्या १३ तारखेला जास्तीत जास्त मतदान करून घेण्यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी प्रयत्न करावेत असे आव्हान भारतीय जनता पार्टीचे युवा नेते शिवराज बाळराजे पवार यांनी संजय नगर भागात झालेल्या कॉर्नर बैठकीदरम्यान बोलताना केले आहे

पुढे बोलताना ते म्हणाले की आम्ही पवार कुटुंब कधीही जात-पात मानत नाही सर्व जाती धर्मांना सोबत घेऊन गावाचा विकास साधने हेच पवार कुटुंबाचं धोरण असल्याचे शिवराज बाळाचे पवार यांनी यावेळी बोलताना सांगितले

आज दिनांक आठ रोजी संजय नगर भागामध्ये लोकसभा निवडणुकीच्या महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुडे यांच्या प्रचारार्थ भारतीय जनता पार्टीचे युवा नेते शिवराज बाळाचे पवार यांच्या नेतृत्वाखाली कॉर्नर बैठकीचे आयोजन करण्यात आले होते

. यावेळी भटक्या विमुक्त आघाडी जिल्हाध्यक्ष डॉक्टर लक्ष्मण जाधव भाजपा जिल्हा उपाध्यक्ष दादासाहेब गिरी नगरसेवक राम पवार ज्ञानेश्वर पवार सुंदर ◀◀ पान ३ वर

भारतीय जनता पार्टीच्या पायाखालची वाळू सरकली

मोदी चार दिवसात अपेक्षीत नाही ते बोलू लागलेत - जयंत पाटील

धारूर । प्रतिनिधी

मागील चार दिवसात अपेक्षीत नाही ते नरेंद्र मोदी बोलू लागले आहेत . देशात जी एटी , गॅस वाढ, खताच्या दरात वाढ झाल्याने सामान्यांना जगणे कठीण झाले आहे .आता हीच वेळ मोदीला बाजूला करण्याची असल्याचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी सांगितले .

धारूर येथे महा विकास आघाडीचे बीड लोक सभेचे उमेदवार बजरंग सोनवने यांच्या प्राचारार्थ धारूर येथे गुरुवारी दुपारी घेण्यात आलेल्या सभेत श्री . पाटील बोलत होते . ते म्हणाले

दोन चार दिवसात नरेंद्र मोदी जे अपेक्षीत नाही ते बोलत आहेत . देशात आदाणी , अंबाणी कसे श्रीमंत झाले त्या मागे देशाचे सरकार आहे . काल सकाळी म्हणाले या दोन उद्योग पतींकडून टेप्पो भरून कॉंग्रेसने धन घेतले आहे . मग कॉंग्रेसने घेतलेले काळे अन्? तुम्ही घेतलेले धन पांढरे कसे असा प्रश्न जयंत पाटील यांनी केला. देशात जनता भाजप सोडून ◀◀ पान ३ वर

विकासाच्या नावाखाली फक्त धुळफेक-माजीमंत्री सुरेश नवले

बीड । प्रतिनिधी

बीड लोकसभेत महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्या प्रचारासाठी अनेक जण भेटीगाठी दौरे करत असून यात माजी मंत्री सुरेश नवले हे सुद्धा चांगले काम करत आहेत. बीड मतदार भवानवाडी, वस्ती, हिवरापाडी, शिवनी फाटा वस्ती, वोडका राजुरी फाटा, मुळे वस्ती, जरूर, हाजीपुर, गाजीपुर, तरडगव्हाण, आर्वी, उमरी, दहिफळ, पिंपरी तांडा, शहरातील अनेक भागात प्रा. सुरेश नवले यांनी गाठीभेटी घेत अनेक सभा घेतल्या. यावेळी बोलताना नवले यांनी अनेक प्रश्न उपस्थित केले. सत्ताधार्यांनी बीड जिल्हा भकास केल्याचे मत सुद्धा माजीमंत्री सुरेश

बजरंग सोनवणेंसाठी सुरेश नवले यांच्या ठिकठिकाणी सभा व कॉर्नर बैठक

नवले यांनी व्यक्त केले आहे. सुरेश नवले यांच्यामुळे बीड मतदार संघात सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे.

सध्या सर्वत्र लोकसभेचे वातावरण निर्माण झाले असून बीड लोकसभेत कोण बाजी मारणार याकडे आता राज्याचे लक्ष लागले आहे. बजरंग सोनवणे यांच्या प्रचारासाठी माजीमंत्री सुरेश नवले यांनी झंझावाती दौरा सुरु केला आहे. त्यांनी शहरीभागासह ग्रामिण ◀◀ पान ३ वर

इंडिया आघाडीच्या उमेदवाराला खासदार फंड लॅप्स होत नाही याचीच कल्पना नाही - खा. प्रितम मुंडे

१७ कोटीचे खर्चुन ३१४ कामे केली

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

खासदार फंड खर्च न करता माघारी पाठवला असा अपप्रचार व्हिडिओ काटछाट करून समाज माध्यमातून मोठ्या प्रमाणावर करण्यात येत आहे. इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्या जाहीर प्रचार सभेमध्ये याबाबतची व्हिडिओ क्लिप वाजवण्यात आली होती याविषयी बोलताना खा. प्रितम मुंडे म्हणाल्या की, विरोधी उमेदवाराला खासदार फंड लॅप्स होत नाही याचीच कल्पना नाही. मी ३१४ कामाला १७ कोटी रुपये खर्च केले आहेत. फंड

खर्च केला नाही असं जर सांगत असतील तर त्याबाबत लेखी पुरावा सादर करावा. कोणत्या कामाला किती निधी खर्च केला याबाबत सर्व माहिती जिल्हा नियोजन समितीकडे आहे. असे खासदार प्रीतम मुंडे यांनी भाजपा महायुतीच्या उमेदवार पंकजा मुंडे यांच्या प्रचारार्थ सभेत बोलताना महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांना खुले आव्हान दिले आहे.भाजपा ज्येष्ठ नेते माजी आमदार भीमराव धोंडे यांनी दि.९रोजी आष्टी येथे प्रचार सभेचे आयोजन केले होते.

निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्प्यात आला असून मतदारांचे अमूल्य मत आपल्या पारडच्यात वळवण्यासाठी जोरदार यंत्रणा राबवली जात आहे. ◀◀ पान ३ वर

हरियाणामध्ये बहुमत चाचणी घेण्याची मागणी

चंदिगड । वृत्तसेवा

लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी रंगली असतानाच हरियाणामध्ये राजकीय उलथापालथ होण्याचे संकेत मिळत आहेत. तीन अपक्ष आमदारांनी सरकारला असलेला पाठिंबा मागे घेतला असतानाच आता माजी उपमुख्यमंत्री दुष्यंत चौटाला यांनी राज्यपालांना पत्र लिहून विधानसभेचे विशेष अधिवेशन बोलावून बहुमत चाचणी घेण्याची मागणी केली आहे. तीन अपक्ष आमदारांनी पाठिंबा मागे घेतल्याने सरकार अल्पमतात आल्याचा दावा विरोधकांकडून करण्यात येत आहे.

माजी उपमुख्यमंत्री आणि जननायक जनता पार्टीचे नेते दुष्यंत चौटाला यांनी आम्ही सध्याच्या सरकारला पाठिंबा देत नसल्याचे सांगितले आहेत. तसेच हरियाणामध्ये दुसऱ्या कुठल्याही पक्षासोबत सरकार स्थापन करण्यास पाठिंब्यासाठी आमचे दरवाजे उघडे आहेत. दोन आमदारांच्या राजीनाम्यानंतर ९० सदस्यांच्या सभागृहातील सदस्यांची संख्या ८८ एवढी आहे. त्यात भाजपाकडे ४० आमदार आहेत. तर काँग्रेसकडे ३०, जेजेपीकडे ६, हलोपा आणि आयएलएलडीकडे प्रत्येकी १ आमदार आहे. त्यामुळे सरकारकडे बहुमताचा आकडा नाही. दुष्यंत चौटाला यांनी राज्यपालांना लिहिलेल्या पत्रातून मागणी केली की, तीन अपक्ष आमदारांनी सरकारला दिलेला पाठिंबा काढून घेतला आहे. त्यामुळे विधानसभेचे विशेष अधिवेशन बोलावून सरकारला बहुमत सिद्ध करण्याचे आदेश देण्यात यावेत.

खा. संजय राऊतावर गुन्हा दाखल करून तात्काळ अटक करा-राम कुलकर्णी

बीड । प्रतिनिधी

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना महाराष्ट्राच्या जमिनीत गाडून टाकू असे म्हणत त्यांना जाहीरपणे मारून टाकण्याची धमकी देणाऱ्या शिवसेना ठाकरे गटाचे मुख्य प्रवक्ते संजय राऊत यांच्या विरोधात भाजपाचे प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी बीड जिल्हा पोलिस अधीक्षक नंदकूमार ठाकूर यांच्याकडे लेखी तक्रार करत राऊत विरोधात गुन्हा दाखल करून अटक करण्याची मागणी केली आहे.

संजय राऊत यांनी अहमदनगर येथील जाहीर सभेत बोलताना देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना महाराष्ट्राच्या मातीत गाडून टाकू अशी जाहीर धमकी देत प्रक्षोभक, बेजाबदार तथा सामाजिक तेढ निर्माण करणारी भाषा वापरली. लोकसभा निवडणुकीत

अशांतता पसरावी हा त्यांचा उद्देश असावा. त्यांच वक्तव्य म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जीवीतास धोका असच होय, त्यांच्या सोबत असलेल्या उच्च प्रशासकीय अधिकारी यांच्या जीवीतस धोका होऊ शकतो. याची दखल घेत भाजपाचे प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी बीड जिल्हा पोलिस अधीक्षक यांच्याकडे लेखी तक्रार देत संजय राऊत यांच्यावर गुन्हा दाखल करून अटक करण्याची मागणी केली आहे.

बजरंग सोनवणे यांना आष्टी तालुक्यातून प्रचंड मताधिक्य द्या -परमेश्वर सातपुते

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील लोणी, वाघळूज, नांदूर. धनगरवाडी, दौलावडगाव, साले वडगाव, अंभोरा, पिंपळगाव, हारेवाडी, मराठवाडी, म्हासोबाची वाडी, घाटा पिंपरी येथे महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्या प्रचारर्थ शिवसना जिल्हा प्रमुख परमेश्वर सातपुते सर, माजी आमदार साहेबराव दरेकर नाना, जिल्हा समन्वयक भाई संजय महाद्वार , जिल्हा संघटक रतन गुजर, यांच्या

प्रमुख उपस्थितीत गाव भेट व बैठकांचे आयोजन करण्यात आले होते याप्रसंगी

सय्यद मिर लोणी येथे बोलताना शिवसेना जिल्हा प्रमुख परमेश्वर सातपुते म्हणाले की केंद्रातील मोदी शहा व राज्यातील गद्दार सरकार मुळे महागाई, बेरोजगारी, प्रचंड वाढली असून सर्व सामान्य जनतेला जगणे अशक्य झाले आहे बेरोजगार तरुणांना नौकरी मिळत नाही सरकारी कंपन्या विकून मोदी खाजगीकरण करत आहे त्यामुळे शिक्षित बेरोजगारांची फौज तयार होत आहे ४०० चे गॅस सिलेंडर १२०० रुपयाला झाले ६० रुपयाचे पेट्रोल ११० रुपये झाले या मुळे गोर गरीब जनतेचे घर चालवताना कसरत करावी लागत आहे हे मोदी सरकार झुमलेबाजीचे सरकार असून मोदी शहा हे फक्त अदानी, अंबानी चे ऐकत आहे असले सरकार आपल्याला ह्या निवडणुकीत मातीत गाडायचे आहे ◀◀ पान ३ वर

शेतकऱ्याच्या आत्महत्येस कारणीभूत असणाऱ्या भाजपला पराभूत करा -ॲड.नारायण गोले

माजलगाव । प्रतिनिधी

इंडिया आघाडीचे बीड लोकसभेचे अधिकृत उमेदवार बजरंग बप्पा मनोहर सोनवणे यांचे प्रचारार्थ दि.०९ मे रोजी शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने माजलगाव तालुक्यातील शुक्लतीर्थ लिमगाव, निपाणी टाकळी, सोन्नाथडी, गुंजथडी, सुरूमगाव येथे जाऊन मतदाराशी हितगुज केले, यावेळी बेरोजगारी,वाढती महागाई, तसेच शेतमालाच्या किफायतशिर हमीभावाचा अभाव यामुळे न परवडणारी शेती यातूनच शेतकऱ्याच्या ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske, Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

शैक्षणिक कर्जमाफीची गॅरंटी पालकांसाठी दिलासाजनक-रवींद्र धंगेकर यांचे प्रतिपादन

पुणे । प्रतिनिधी

काँग्रेस पक्षाने आपल्या जाहीरनाम्यात पाच न्याय आणि २५ हमी दिल्या आहेत. त्यातील शैक्षणिक कर्जमाफीची हमी ही ऐतिहासिक स्वरूपाची आहे. राजकीय पक्षांनी अशा स्वरूपाची गॅरंटी देण्याचा हा पहिलाच प्रकार आहे. त्यातून असंख्य पालकांना आणि विद्यार्थ्यांना दिलासा मिळणार आहे, असे प्रतिपादन महाविकास आघाडीचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांनी केले. धंगेकर यांनी म्हटले आहे, की मार्च २०२४ पूर्वी ज्यांनी शैक्षणिक कर्ज घेतले आहे, ते कर्ज माफ करण्याची हमी काँग्रेसने दिली आहे. सध्या महागाईमुळे मध्यमवर्गीय, तसेच गरिबांना आपल्या मुलांचा शैक्षणिक खर्चही परवडेनासा

झाला आहे. त्यातच इंजिनिअरिंग किंवा अन्य व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रचंड रकमेची फी पालकांना भरावी लागते. त्यासाठी हजारो पालकांनी शैक्षणिक कर्जाचा मार्ग निवडून पोटाला चिमटा घेऊन मुलांच्या शिक्षणाची सोय केली आहे. या शैक्षणिक कर्जाचे हप्ते, व्याज आणि परतफेड करणे जिकिरीचे बनले आहे. त्यामुळे देशातील विद्यार्थी व पालकांची ही अडचण लक्षात घेऊन काँग्रेसने शैक्षणिक कर्जमाफीची क्रांतिकारी हमी जाहीर केली आहे. या शैक्षणिक कर्जमाफीचा लाभ पुण्यातल्याही असंख्य विद्यार्थी आणि पालकांना होणार असल्याने त्यांनी या निर्णयावर समाधान व्यक्त केले आहे.

स्वातंत्र्य मिळाल्यापासून आजपर्यंत शैक्षणिक कर्जाच्या माफीची गॅरंटी कोणत्याच राजकीय पक्षांनी दिलेली नाही. त्यामुळे काँग्रेसची ही गॅरंटी ऐतिहासिकही ठरली आहे, असेही धंगेकर यांनी म्हटले आहे. त्याखेरीज पदवीधर झालेल्या विद्यार्थ्यांना किंवा पदविका मिळवणार्या विद्यार्थ्यांना वार्षिक एक लाख रुपये मदतीची अप्रेंटिसशिप योजना काँग्रेसने या जाहीरनाम्यात सादर केली आहे. त्याचाही देशभरातील सर्वच पदवी व पदविकाधारक युवकांना लाभ होणार असल्याचे पत्रकात म्हटले आहे.

खेडमध्ये रविवारी देशी बियाणे महोत्सव

खेड । प्रतिनिधी

देशातील स्थानिक, देशी वाणांचे बियाणे टिकावे, त्यांची देवाण-घेवाण तसेच संवर्धन व्हावे आणि त्यांचा प्रचार-प्रसार व्हावा, या हेतूने खेड तालुक्यातील सह्याद्री स्कूल, मुक्ताई महिला शेतकरी गृहउद्योग गट व समृद्ध सह्याद्री शेतकरी उद्योग यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या रविवारी (दि. १२) सह्याद्री स्कूलच्या आवारात देशी बियाणे महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या वेळी भाताच्या विविध स्थानिक वाणांसह तृणधान्य व भाजीवर्गीय बियाणे उपलब्ध होणार आहेत.

रविवारी होणार्या देशी बियाणे महोत्सवात शेतकर्यांना स्थानिक आंबेमोहर, काळा तांदूळ-चकहाव, लाल तांदूळ-कुरुवा, लाल तांदूळ-मुणगा, डायबेटीक राईस तांदूळ-नवारा ब्लॅक हस्क, सफेद तांदूळ-तुळश्या, सफेद

तांदूळ-आंबेमोहर (जुन्नर), सफेद तांदूळ-आंबेमोहर (मावळ), सफेद तांदूळ-बासमती (चंद्रपूर), सफेद तांदूळ-चिनोर (चंद्रपूर) आदी भात बियाण्यांसह नाचणी, वरई, बर्टी, राळा व बाजरी, काटेरी वांगी, गावरान टोमॅटो, लाल भेंडी, श्रावणी घेवडा, डबल बी, बांधावरचे वाल, दोडका, घोसाळी, पालक, आंबट चुका, अंबाडी- स्पेशल (भरीव बोंडाची), थाई बेजील, स्वीट बेजील शेंदरी (बिक्साद्य रंग देणारे), हातगा-स्पेशल (गडद गुलाबी) अशी बियाणे उपलब्ध होणार आहेत. जास्तीत जास्त शेतकर्यांनी या बियाणे महोत्सवाला भेट द्यावी, असे आवाहन देशी बियाणे संवर्धक व समन्वयक, सह्याद्री स्कूल आउटरिच (कृष्णामूर्ती फाउंडेशन) दीपा मोरे यांनी केले आहे.

अनियमित पाऊस व कीटकांच्या हल्ल्यांमुळे संकरित बियाणे टिकाव धरत नाहीत, असे निदर्शनास आले आहे. सध्या सर्व शेतकरी एकच बियाणे, एकच वाणाचे (उदा. इंद्रायणी) पीक घेतात. एखादी रोगराई आली तर संपूर्ण परिसरातील भातपीक बाधित होते. परंतु देशी व स्थानिक भात पिकांची लागवड केल्यास कमी-अधिक पावसात ही पिके तग धरून राहू शकतात, असा अनुभव आहे. तसेच देशातील अनेक स्थानिक वाण नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. हे पारंपरिक व देशी बियाणे टिकले पाहिजे, त्यांचे संवर्धन झाले पाहिजे व ते परिसरातील शेतकर्यांपर्यंत पोहचावीत यासाठी कृष्णामूर्ती फौंडेशनचे सह्याद्री स्कूल गेली अनेक वर्षांपासून प्रयत्नशील आहे.

पुण्यात गोळीबार! तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

पुणे । प्रतिनिधी

वारजे माळवाडीत दहशतीसाठी तरुणांनी भर चौकात नागरिकांसमोरच रस्त्यावर तीन गोळ्या झाडल्याचे समोर आले. त्यामुळे पोलिसांच्या झाडाझडतीला अन् समोर उभा करून 'पोलिसी समज', 'परेड' आणि 'हजेरी'ला गुन्हेगारांकडून आव्हान दिले जात असल्याचे वारंवार होणार्या घटनांवरून दिसत आहे. मागील पंधरवड्यात शहरात सलग चार गोळीबारांच्या घटना घडल्या असून, त्यामध्ये एका तरुणाचा मृत्यू झाला आहे. त्यानंतरही गोळीबाराचे प्रकार थांबताना दिसून येत नाहीत. याप्रकरणी वारजे माळवाडी पोलिस ठाण्यात पोलिस शिपाई हेमकांत पवार यांनी तक्रार दिली आहे. त्यानुसार, तीन अनोळखी व्यक्तींवर गुन्हा दाखल केला आहे. शहराच्या कात्रज, धायरी, नर्हे, वारजे,



उत्तमनगरच्या परिसरात बारामती लोकसभा मतदारसंघात येत असल्याने या भागात मंगळवारी दिवसभर मतदानाची लगबग होती. त्यामुळे पुणे पोलिसांकडून या भागात गेल्या दोन दिवसांपासून चोख बंदोबस्तही ठेवला होता. मतदानाच्या आदल्या दिवशी म्हणजे सोमवारी रात्री मोठी गस्तदेखील घालण्यात आली होती. मंगळवारचा दिवस शांततेत पार पडला. मतदान प्रक्रिया सुरळीत पार पडल्यानंतरर पुणे पोलिसांचा बंदोबस्तही संपला. मात्र, त्यानंतर गुन्हेगारी प्रवृत्तीच्या टोळक्यांनी दहशत माजविण्यास सुरुवात केली.

नागरिक दिवसभराच्या मतदानाची चर्चा करत असताना साधारण पावणेअकराच्या सुमारास वारजे माळवाडीतील रामनगरमधील भीमशक्ती चौकात तीन तरुणांनी अचानक येऊन नागरिकांसमोरच रस्त्यावर एकापाठोपाठ एक अशा तीन गोळ्या झाडल्या. वरिष्ठ निरीक्षक मनोज शेडगे, पोलिस निरीक्षक नीलकंठ जगताप व त्यांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेत तपासाला सुरुवात केली. पाहणीत पोलिसांना दोन गोळ्यांच्याच पुंगळ्या दिसून आल्या आहेत. त्यामुळे दोन गोळ्या झाडण्यात आल्याचा संशय आहे. बुधवारी दुपारपर्यंत गोळीबार करणार्यांचा थांगपत्ता लागलेला नव्हता.

विद्यार्थिनीच हॉस्टेलमधील मुलींचे व्हिडिओ काढून पाठवत होती बॉयफ्रेंडला

पुणे । प्रतिनिधी

पुण्यातील प्रसिद्ध इंजिनिअरींग कॉलेजच्या होस्टेलमधून एक धक्कादायक घटना घडली आहे. हॉस्टेलमधील विद्यार्थिनींचे चोरून व्हिडिओ काढून सोशल मीडियावर व्हायरल केले जात होते. धक्कादायक म्हणजे एक विद्यार्थिनींनीच या प्रकारात सामिल असल्यामुळे खळबळ उडाली आहे. या विद्यार्थिनीवर आणि तिचा मित्र विनीत सुराणा यांच्यावर शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून विद्यार्थीनीला डीबार केलं असल्याचं कॉलेज प्रशासनाने म्हटलं आहे.

पुण्यातील प्रसिद्ध कॉलेजमधील घटनेने खळबळ

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आरोपीने हॉस्टेलमध्ये विद्यार्थीनींचे चोरून व्हिडीओ शूट केले. ते व्हिडीओ ती तीचा मित्र विनीत सुराणा याला पाठवायची. विद्यार्थीनींचे या व्हिडीओचा दोघांनी गैरवापर केल्याची प्राथमिक माहिती आहे. दोघांनी मिळून अनेक विद्यार्थीनींचे व्हिडीओ काढून ते सोशल मीडियावर टाकले आहेत. या दोघांनी मिळून अनेक विद्यार्थिनींचे व्हिडिओ काढून सोशल मीडियावर शेअर केल्याची माहिती आहे. ऋया प्रकरणी चौकशी सुरू केली असून पोलीसांत तक्रार दिली असल्याचा खुलासा सीईओपीने केला आहे. संबधीत विद्यार्थिनीला डीबार केले असल्याचे तसेच चौकशी पूर्ण होईपंर्यंत या विद्यार्थीनीला निलंबीत करण्यात आल्याचंही म्हटलं आहे.

डंपरच्या धडकेत पत्नीचा मृत्यू, पती जखमी; पुणे-सातारा महामार्गावर अपघात

नसरापूर : सुट्टीसाठी मूळगावी जाणाऱ्या पती-पत्नीच्या दुचाकीला डंपरने पाठीमागून जोरदार धडक दिली. या अपघातात पत्नीचा जागीच मृत्यू झाला, तर तिचा पती जखमी झाला. अपघातानंतर डंपर चालकाने तेथून पलायन केले आहे. पुणे-सातारा महामार्गावर शिवरे (ता. भोर) गावच्या हद्दीत गुरुवारी (दि. ९) रोजी सकाळी सव्वानऊच्या सुमारास हा अपघात घडला.

सोनाली महेश साठे (वय २३) असे या अपघातात मृत्यू झालेल्या पत्नीचे नाव आहे. तर तिचा पती महेश बाळू साठे (वय २८, रा. दोघेही रा. सध्या रा. गजाननगर, फुरसंगी, ता. हवेली, पुणे. मूळ रा. बांबवडे, ता. पलूस, जि. सांगली) हा जखमी झाला आहे. याप्रकरणी महेश साठे यांनी राजगड पोलिस ठाणे, नसरापूर येथे फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी धडक देऊन पसार झालेल्या डंपरचालकावर गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पुण्यात कामाला असणारे महेश आणि सोनाली हे दोघे गुरुवारी सकाळी त्यांचे मूळ गाव बांबवडेला दुचाकी (एमएच १० डीयू ७५५९) वरून जात होते. पुणे-सातारा महामार्गावर शिवरे गावच्या हद्दीत त्यांना पाठीमागून भरधाव आलेल्या डंपरने (एमएच १२ व्हीटी ८६८९) जोरात धडक दिली. यामध्ये रस्त्यावर पडलेल्या सोनालीच्या अंगावरून डंपरचे चाक गेल्याने तिचा जागीच मृत्यू झाला, तर महेश जखमी झाला. दरम्यान, खेड-शिवापूर टोलनाक्याच्या रुग्णवाहिकांमधून दोघांनाही नसरापूर येथील खासगी हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, उपचारापूर्वीच सोनालीचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. या प्रकरणी राजगड पोलिस पुढील तपास करीत आहेत.

मुले पळविल्याच्या अफवेने खळबळ : शिक्रापूर व तळेगाव ढमढेरे येथील प्रकार

तळेगाव ढमढेरे : : शिक्रापूर येथे एका भंगार व भांडी व्यावसायिकाने दौंड तालुक्यातील पाटेठाण परिसरातून दोन मुलांना पळवून आणल्याची अफवा बुधवारी (दि. ८) दुपारच्या सुमारास पसरली आणि शिक्रापूरसह यवत पोलिसांची चांगलीच धावपळ उडाली. मात्र, गैरसमजातून घडलेल्या या प्रकारात नागरिकांनी भंगार व्यावसायिकाची गाडी फोडून त्याला बेदम मारहाण केल्याने तणाव निर्माण झाला. परंतु, पोलिसांच्या सतर्कतेने या घटनेला आवर घालण्यात यश आले. शिक्रापूर (ता. शिरूर) येथे पाटेठाण येथील दोन लहान मुलांना एका भंगार व्यावसायिकाने अपहरण करून आणल्याची अफवा पसरली आणि शिक्रापूर पोलिसांची धावपळ सुरू झाली.

दरम्यान, शिक्रापूर-तळेगाव रस्त्यालगत नागरिकांनी अपहरण करणार्या संशयिताला पकडून बेदम मारहाण करण्यास सुरुवात करीत त्याची गाडी देखील फोडून त्याला तळेगाव ग्रामपंचायतीसमोर नेले. १०० पेक्षा अधिक लोकांचा जमाव तळेगाव ढमढेरे येथे गोळा झाल्याने त्या व्यक्तीला बेदम मारहाण करण्यात आली. या वेळी सहायक पोलिस निरीक्षक केशव वाबळे, पोलिस हवालदार किशोर तेलंग, विकास पाटील, पोलिस नाईक अमोल नलगे, रोहिदास पारखे, प्रफुल्ल सुतार, नारायण सानप, अंकुश चौधरी, तळेगाव ढमढेरेचे पोलिस पाटील पांडुरंग नरके पाटील आदींनी घटनास्थळी धाव घेत जमावाला आवर घातला. दरम्यान, यवतचे पोलिस हवालदार अजय दौंडकर देखील घटनास्थळी दाखल झाले.

दरम्यान, या वेळी चौकशी केली असता संबंधित भांडी व भंगार व्यावसायिकाने पाटेठाण येथून महिलेकडून काही भंगार घेतले. त्याच्याकडे पूर्ण पैसे नसल्याने त्याने मी मुलांकडे पैसे देतो, माझ्यासोबत पाठवता का? असे म्हटल्याने त्या महिलांनी मुलांना पाठविले होते. याचवेळी पाटेठाणमध्ये मुले पळवून नेल्याबाबतचा संदेश पसरला अन् खळबळ उडाली. पाटेठाण येथून आलेल्या युवकांनी शिक्रापूर येथे त्याला पकडून बेदम मारहाण करण्यास सुरुवात केल्याने जमलेल्या नागरिकांनीसुद्धा त्याला बेदम मारहाण केली. अखेर सत्य परिस्थिती समोर आली आणि मुले पळविल्याची अफवा असल्याचे निष्पन्न झाले. मात्र, मारहाण करण्यात आलेल्या व्यक्तीच्या वाहनाचे नुकसान व जमावाने केलेल्या मारहाणीबाबत तक्रार दाखल करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

४ कोटी ५० लाख रुपयांच्या लाचप्रकरणी कॉग्निझंट व लार्सन अण्ड टुब्रो कंपनीच्या तत्कालीन अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल

पुणे । प्रतिनिधी

व्यावसायिक इमारतीचे बांधकाम करण्यासाठी लागणाऱ्या पर्यावरण विषयक परवानगी मिळवण्यासाठी ७ लाख ७० हजार अमेरिकन डॉलर्स (भारतीय चलनातील अंदाजे ४ कोटी ५० लाख रुपये) लाच दिली. या प्रकरणी न्यायालयाच्या आदेशानुसार पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने बुधवारी (दि.८) बंडगार्डन पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. हा प्रकार सन २०१२ ते सन २०१४ मध्ये पुण्यात घडला होता.

याबाबत तक्रारदार यांनी सत्र न्यायालयात गुन्हा दाखल करण्यासाठी अर्ज केला होता. न्यायालयाच्या आदेशानुसार पुणे एसीबीने बहुराष्ट्रीय कंपनी कॉग्निझंट टेक्नॉलॉजी सोल्युशन्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड चे तत्कालीन अधिकारी, तत्कालीन उप संचालक श्रीमनिकंद राममुर्ती, लार्सन अँड टुब्रो चे तत्कालीन अधिकारी, विविध शासकीय विभागाचे तत्कालीन अधिकारी व इतर अनोळखी खासगी व्यक्तींवर गुन्हा दाखल केला आहे.

कॉग्निझंट टेक्नॉलॉजी सोल्युशन्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड ही कॉग्निझंट टेक्नॉलॉजी सोल्युशन कार्पोरेशन अमेरिका या कंपनीची उपकंपनी आहे. कॉग्निझंट टेक्नॉलॉजी सोल्युशन्स इंडिया प्रा. लि. या कंपनीने मद्रास, तामीळनाडू, पुणे, महाराष्ट्रासह भारात अनेक ठिकाणी प्रोजेक्ट सुरु केले आहेत. यासाठी २०१२ मध्ये या कंपनीने पुण्यात हिंजवडी या ठिकाणी व्यावसायिक इमारतीचे बांधकाम सुरु केले होते. कॉग्निझंट इंडियाचे, हिंजवडी येथील प्रकल्पाच्या इमारतीचे बांधकामाची जबाबदारी कॉग्निझंट कंपनीचे श्रीमनिकंदन राममुर्ती यांच्यावर होती.

राममुर्ती व एल ऍण्ड टी या कंपनीने कॉग्निझंट इंडिया टेक्नॉलॉजी सोल्युशन प्रा. लि. पुणे या हिंजवडी येथील इमारतीचे बांधकामाच्या संदर्भात पर्यावरणीय मंजुरी मिळवण्यासाठी तेथील अधिकाऱ्यांशी संगनमत केले. त्यांनी भ्रष्ट मार्गाचा अवलंब करुन परवानगी मिळवल्या. यासाठी राममुर्ती यांनी ७ लाख ७० हजार अमेरिकन डॉलर्स इतकी रक्कम लाच म्हणून अनोळखी अधिकाऱ्यांना दिली.

तक्रारदार यांनी याबाबतची तक्रार पुणे एसीबीकडे केली. मात्र, एसीबीकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने त्यांनी सत्र न्यायालयात धाव घेतली. न्यायालयाला प्रथमदर्शनी तथ्य आढळून आल्याने विशेष न्यायालय तथा सत्र न्यायाधीश यांनी फौजदारी कलम १५६ नुसार गुन्हा दाखल करुन तपास करण्याचे आदेश पुणे एसीबी कार्यालयाला दिले होते. त्यानुसार पुणे एसीबीने बुधवारी बंडगार्डन पोलीस ठाण्यात फिर्याद दिल्याने पोलिसांनी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पुणे एसीबीचे पोलीस उपअधीक्षक सुदाम पाचोरकर करीत आहेत.

ऐन उन्हाळ्यात पुण्याला पावसानं झोडपलं; उकाड्याने हैराण झालेल्यांना मिळाला दिलासा

पुणे । प्रतिनिधी

गेल्या काही दिवसांपासून कडक उन्हामुळे नागरिकांच्या अंगाची लाहीलाही झाली होती. मागील दोन दिवसांत पुण्याचे तापमान ४१ सेल्सिअसपर्यंत पोहोचलं होतं. या तापमानामुळे शहरात उष्माघाताचे रुग्ण वाढले होते. या कडक उन्हाने त्रस्त झालेल्या नागरिकांना आज गुरुवारी निसर्गाने मोठा दिलासा आहे. ऐन उन्हाळ्यात कोसळलेल्या अवकाळी पावसाने उकाड्याने त्रस्त झालेल्या पुणेकरांना मोठा दिलासा दिला आहे.

पुणे शहरात गुरुवारी विविध भागात जोरदार पावसाने हजेरी लावली. हवामान खात्याने वर्तवेलेल्या अंदाजानुसार आज गुरुवारी पाऊस कोसळला. त्यानंतर शहराचं ४१ डिग्री सेल्सिअसपर्यंत पोहोचलेल्या तापमानापासून मोठा दिलासा मिळाला आहे. या अवकाळी पावसामुळे उकाड्याने हैराण झालेल्या पुणेकरांना मोठा दिलासा मिळाला आहे.

पुणे शहरात झालेल्या पावसाने अनेक ठिकाणी रस्त्यावर पाणी जमा झाले आहे. पुण्यातील नांदेड सिटी परिसरातील रोडवर पाणी

जमा झालं. त्यानंतर गाड्या चालवताना मोठी कसरत पुणेकरांना करावी लागत आहे. तर पुण्यातील शिरुर,आंबेगाव, खेड, जुन्नर तालुक्यातील अनेक भागाला जोरदार अवकाळी पावसाने झोडपलं.

दुपारी अचानक कोसळलेल्या पावसामुळे बळीराजा शेतकऱ्यांना मोठा फटका बसणार आहे. या अवकाळी पावसामुळे काढणीला आलेला कांदा आणि फळबागांना मोठा फटका बसणार आहे. तर ग्रामीण भागात अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने वातावरणात गारवा निर्माण झाल्याने काही दिलासा मिळणार आहे. सकाळपासूनच परिसरात ढगाळ वातावरण पाहायला मिळत होतं. त्यानंतर आज दुपारनंतर या भागात जोरदार अवकाळी पाऊस बरसला आहे.

आंबेगाव विधानसभा मतदारसंघात निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज

शिरूर : शिरूर लोकसभा सार्वत्रिक निवडणुकींतर्गत आंबेगाव विधानसभा १९६ ची मतदान यंत्रणा सज्ज झाली असल्याची माहिती निवडणूक अधिकारी गोविंद शिंदे यांनी दिली. प्रशासनाच्या वतीने गृह मतदान घेण्यात येणार आहे. मतदान केंद्रांत येऊन मतदान करण्यात सक्षम नसलेले दिव्यांग किंवा ८५ वर्षांच्या मतदारांसाठी थेट घरातून मतदानाची सोय करण्यात आली आहे. त्या दृष्टीने सर्व तयारी पूर्ण झाल्याची माहिती साहाय्यक निवडणूक अधिकारी गोविंद शिंदे यांनी दिली. शिरूर लोकसभेचे १३ मे रोजी मतदान होत आहे. यासाठी आंबेगाव विधानसभा मतदारसंघासाठी २२०० कर्मचार्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.

अवसरी शासकीय कॉलेज येथे ईव्हीएम मशिनबद्दल माहिती देऊन मशिन सील करून अवसरी शासकीय स्ट्राँग रूममध्ये ठेवण्यात आल्या असून, तेथे मोठा पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे, असेही शिंदे यांनी सांगितले. आंबेगाव विधानसभा मतदारसंघात १८२ गावे आहेत. एकूण केंद्र ३४०, एकूण मतदार ३ लाख २ हजार १०१ असून, लोकसभा मतदारसंघात एकूण ३२ उमेदवार रिंगणात आहेत. मतदानाच्या दिवशी उष्माघात होऊ नये म्हणून वैद्यकीय सुविधा पुरविण्यात येणार आहेत. ८५ वर्षे वयापेक्षा अधिकचे ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग व्यक्ती अशा १७५ नावांची यादी अंतिम झालेली आहे.

या १७५ व्यक्ती ६३ गावांतील आहेत. या ६३ गावांच्या बीएलओ यांनी दिलेल्या शिफारसीच्या आधारावर ही यादी तयार झालेली आहे. दि. ७, ८ व ९ मे रोजी हे गृह मतदान करून घेतले जात आहे. त्यासाठी एकूण ७ पथके निश्चित केलेली आहेत. या मतदानाचे संपूर्ण व्हिडिओ चित्रीकरण होणार आहे. तसेच कर्तव्यावर असलेल्या १८९ अधिकारी, कर्मचारी यांचे टपाली मतदान दि. ८, ९ व १० मे रोजी सुरू झाले आहे. असे तहसीलदार संजय नागटिळक यांनी सांगितले.

उद्योगाला चालना देऊन बेरोजगारीची समस्या सोडविणार : मुरलीधर मोहोळ

पुणे । प्रतिनिधी

शहरातील सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योग एमएसएमई आणि स्टार्टअप्सच्या विकासाला चालना देऊन बेरोजगारीची समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन पुणे लोकसभा मतदारसंघातील भाजप महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांनी दिले. मोहोळ यांच्या प्रचारासाठी मंडई, गाडीखाना, खडकमाळ आळी, कस्तुरे चौक, कृष्णाहट्टी चौक, लोहियानगर, मीठगंज पोलिस चौकी परिसरात प्रचारफेरीचे आयोजन करण्यात आले होते. आमदार माधुरी मिसाळ, हेमंत रासने, दीपक मिसाळ, स्वरदा बापट, अजय खेडेकर, विष्णू हरिहर, आरती कोंढरे, सम्राट थोरात, योगेश समेळ, राजेश येनपुरे, संजय देशमुख, राजेंद्र कोंढरे, राजेंद्र काकडे, अमित कंक, चंद्रकांत पोटे, गौरव साइनकर, प्रशांत सुर्वे, नीलेश कदम, गणेश भोकरे, अजय दराडे, कपिल जगताप, प्रमोद कोंढरे, प्रणव गंजीवाले, उमेश चव्हाण, अभिजित राजपूत, दिलीप काळोखे, उदय लेले, अश्विनी पवार, निर्मल हरिहर, संकेत थोपटे, वैशाली नाईक, निलेश जगताप, नामदेव माळवदे, ईश्ताइक शेख यांची प्रमुख उपस्थिती होती.

या वेळी मोहोळ म्हणाले, एमएसएमई आणि स्टार्टअप क्षेत्राची क्षमता वाढवून शहराला देशात अग्रस्थान मिळवून देण्यासाठी काम करणार आहे. स्वतंत्र विमानतळ, पायाभूत सुविधांची निर्मिती, किफायतशीर औद्योगिक वीजदर, मुबलक पाणी, कुशल मनुष्यबळ, मोक्याची जागा, सुरळीत वाहतूक आदी उद्योगांसाठी

आवश्यक असणार्या बाबी मिळवून देण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करू. त्यासाठी या क्षेत्रातील तज्ज्ञांशी नियमित संवाद साधणार आहे. आयटी हबला बूस्टर मिळावा यासाठी धोरण आखणार आहे. आयटी हबमुळे बांधकाम क्षेत्रापासून लॉन्ड्री, मेसपर्यंत छोट्या-मोठ्या व्यवसायांतून रोजगारनिर्मिती होते. त्यामुळे अर्थव्यवस्थेला चालना मिळते. राज्याच्या दरडोई उत्पन्नात १८ टक्के वाटा पुणे शहराचा आहे. उद्योग, सेवा आणि व्यावसायिकांना उपयुक्त ठरेल असे आंतरराष्ट्रीय दर्जाचे एक्झिबिशन सेंटर उभारण्यासाठी पाठपुरावा करणार आहे. तसेच, निर्यातवाढीसाठी जिल्ह्याचा आराखडा तयार करणार असल्याचे मोहोळ यांनी सांगितले.